भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२००९-१०/७८**
**युबीडी.बीपीडी (पीसीबी) एमसी क्र. १३/१३.०१.०००/२००९-१०**

**जुलै १, २००९**

**सर्व प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांचे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**महोदय,**

**ठेवी खाती ठेवण्यावरील महापरिपत्रक-युसीबीज्**

वरील विषयावरील आमचे महापरिपत्रक, युबीडी, बीपीडी (पीसीबी), एमसी क्र. १३/१३.०१.०००/२००८-०९ दि. जुलै १, २००८ चा कृपया संदर्भ घ्यावा (हे आरबीआयच्या WWW. rbi. org. in ह्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे) सोबत जोडलेल्या महापरिपत्रकात, ह्या विषयावरील, जून ३०, २००९ पर्यंतच्या सूचना/मार्गदर्शक तत्वे अद्यावत करुन एकत्रित करण्यात आली आहेत.

आपला
**(ए.के. खौंड)**
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

सोबत - वरील प्रमाणे

<u>**ठेवी खाती ठेवण्यावरील महापरिपत्रक**</u>

## <u>अनुक्रमणिका</u>


| परिच्छेद क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **१** | **प्रस्तावना** | **१** |
| **२** | **ठेवी खाती उघडणे** | **१** |
| २.१ | नवीन ठेवीदारांना प्रवेश देणे | |
| २.२ | खातेदारांची छायाचित्रे | |
| २.३ | खातेदाराचे पत्ते | |
| २.४ | इतर सुरक्षा उपाय | |
| २.५ | एनआरओ/एनआरई खाती उघडणे | |
| **३** | **विशिष्ट प्रकारची ठेव खाती उघडण्यावरील निर्बंध** | **७** |
| ३.१ | लॉक-इन कालावधी असलेल्या ठेव - योजना | |
| ३.२ | आई पालक असलेल्या अल्पवयीन व्यक्तीचे खाते | |
| **४** | **नामनिर्देशन सुविधा** | **८** |
| ४.१ | कार्यकारी सूचना | |
| ४.२ | अधिनियमाच्या तरतुदी | |
| ४.३ | नियम | |
| ४.४ | नामनिर्देशनाचे रेकॉर्ड | |
| ४.५ | सेफ कस्टडीमधील वस्तूंबाबत नामनिर्देशन सुविधा | |
| ४.६ | सेफ डिपॉझिट लॉकर खात्यांबाबत नामनिर्देशन सुविधा | |
| **५** | **खात्यांमधील कार्यरीती/व्यवहार** | **१४** |
| ५.१ | संयुक्त खाती | |
| ५.२ | नवीन खात्यांमधील व्यवहारांवर देखरेख | |
| ५.३ | सर्व खात्यांमधील व्यवहारांवर देखरेख | |
| ५.४ | चेकबुक्स देणे | |
| ५.५ | बिनहक्कांच्या आणि अकार्यकारी/सुप्त खाती | |
| ५.६ | मोठ्या रकमांच्या व्यवहारांसाठी इलेक्ट्रॉनिक रीतींचा उपयोग | |
| ५.७ | वृध्द/आजारी/अपंग ग्राहकांकडून बँकखाती चालविली जाणे | |
| ५.८ | विदेशातून आलेल्या रकमांचा स्वीकार | |
| **६** | **मृत ग्राहकांची खाती** | **२२** |
| **७** | **हरविलेल्या व्यक्तींबाबत हक्कांची हिशेबपूर्ती** | **२५** |
| **८** | **ठेवी वाढविण्याचे प्रयत्न** | **२६** |
| ८.१ | ठेवी गोळा करणारे एजंट्स | |
| ८.२ | इनकॉर्पोरेट न झालेल्या संस्था/प्रायवेट लिमिटेड कंपन्यांकडून “बँक | |

| | | |
|---|---|---|
| | हमी" सह ठेवींचा स्वीकार | |
| ८.३ | खाजगी संस्थांनी उभ्या केलेल्या ठेवी गोळा करण्याच्या योजना | |
| **९** | **इतर पैलु** | **२६** |
| ९.१ | बँक प्रणाली व आयकर प्राधिकरणे ह्या दरम्यान अधिकतर समन्वय | |
| ९.२ | हक्क व सांगितल्या गेलेल्या ठेवींसाठी रजिस्टर | |
| १० | "तुमचा ग्राहक जाणा" (केवायसी) | २७ |
| १०.१ | "तुमचा ग्राहक जाणा" (केवायसी) बाबतची मार्गदर्शक तत्वे | |
| १०.२ | आर्थिक दहशतवादाविरुध्द द्वंद्व | |
| ● | **जोडपत्र १** | **३०** |
| ● | **जोडपत्र २** | **३३** |
| ● | **परिशिष्ट** | **३४** |

## ठेवीखाती ठेवण्यावरील महापरिपत्रक

### १) प्रस्तावना

कोणत्याही बँकेसाठी ठेवी स्वीकारणे व त्या ठेवणे ही एक मूलभूत कार्यकृती आहे. बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ मध्ये व्याख्या केलेल्या "बँकिंग" ह्या शब्दाचा अर्थ म्हणजे, कर्ज देण्यासाठी किंवा गुंतवणुक करण्याच्या हेतूने जनतेकडून पैशांच्या ठेवी स्वीकारणे, ज्या जनतेने मागणी केल्यास किंवा अन्यथा परत करता येतील व ज्या चेक, ड्राफ्ट किंवा, आदेश किंवा अन्य रितीने काढता येतील. त्यामुळे ठेवी त्या बँकेचा महत्वाचा स्त्रोत आहेत आणि बँकेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सुयोग्य ठेवी मिळविण्यासाठी प्रयत्न व प्रचार करणे. प्राथमिक (नागरी) सहकारी बँकांना, ठेवखाती उघडण्याबाबत आणि ती चालविणे/देखरेख ठेवण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या निरनिराळ्यासूचना व मार्गदर्शक तत्वे खाली तपशीलवार दिली आहेतः-

### २) ठेवखाती उघडणे

### २.१ नवीन ठेवीदारांना प्रवेश देणे

खोट्या नावाने खाती उघडणे, खात्यांमध्ये लबाडीने फेरफार करणे, आणि अप्राधिकृत व्यवहार करणे ह्यामधूनच बँकांमध्ये मोठ्या संख्येने फसवणुकी होत असतात. बँकेचा ग्राहक बनण्यासाठी खाते उघडणे ही पहिली पायरी असल्याने, खाते उघडणे व ते चालविणे ह्याबाबत अत्यंत सावधगिरि घेणे आवश्यक आहे. पराक्रम्य संलेखांचे प्रदान १ गोळा करणे नियंत्रित करणारा निगोशिएबल इंस्ट्रुमेंट अधिनियम, १८८१, देणारा/आदेशक अधिनियमाखाली आदेशिती, एंडॉर्सीज्, गोळा करणाऱ्या बँका, आणि देणाऱ्या/काढणाऱ्या बँका ह्यांना काही हक्क, दायित्वे व संरक्षण देत असला तरी, बँकांनी एखाद्या चेक/पे टु ऑर्डर ड्राफ्टचे प्रदान योग्य तऱ्हेने केल्यासच त्यांना त्या अधिनियमाखाली कायदेशीर संरक्षण मिळते. एखाद्या पराक्रम्य संलेखाचे प्रदान किंवा गोळा करणे, एखाद्या ग्राहकासाठी, बँकेने विश्वासपूर्वक व हलगर्जीपणा न करता केल्यासच ते योग्य तऱ्हेने केल्याचे समजले जाते.

### २.१.१ ओळख पाठविण्याची गरज

१) एखाद्या खात्यासाठी खातेदाराची ओळख पटविणे हे केवळ एक रीत म्हणून व निगोशिएबल इंस्ट्रुमेंट्स अधिनियम १८८१ च्या कलम १३१ खाली संरक्षण मिळविण्यासाठीच नसते. तर खाते उघडणाऱ्या व्यक्तीची ओळख करण्यासाठी केले जाते व त्यामुळे त्या व्यक्तीला गरज भासेल तेव्हा शोधणे सुलभ होते.
२) बँकांना त्यांच्या ग्राहकांची ओळख असणे आवश्यक आहे व त्यासाठी त्यांनी योग्य त्या प्रणाली व कार्यरीती ठेवल्या पाहिजेत. योग्य अशी ओळख मिळविणे हे एक रीत म्हणून न समजले जाता, बेहिशेबी पैसा ठेवण्यासाठी खोट्या नावाने किंवा अवांच्छित व्यक्तींद्वारे खाती उघडण्याविरुध्द एक सुरक्षा उपाय समजला जावा.

## २.१.२ सुयोग्य ओळख

१) सर्वसाधारणतः बँकेचे अधिकारी व ग्राहक ह्यांची प्रत्यक्ष भेट झाल्याशिवाय खाते उघडले जाऊ नये.
२) केवळ चालु व चेकद्वारा चालित बचत खातीच नव्हे तर, कॉल, लघुमुदतीच्या व स्थिर ठेवी खात्यांसारखी सर्व ठेवी खाती उघडण्यासाठी, बँकांनी, त्यांच्या भावी खातेदारांना ओळख देण्याचा आग्रह धरावा (विद्यमान खातेदारांपैकी कोणाचीही किंवा बँक ओळखत असलेल्या स्थानिक समाजातील आदरणीय व्यक्तीची किंवा बँकेच्या कर्मचाऱ्याची). त्यांच्या ठेवीदारांची ओळख पटविण्याबाबत समाधान होईल असे उपाय/रीती बँकेने योजाव्यात.
३) ओळख देणारांची भूमिका अधिक नेमकेपणाने केली जावी. तो एखाद्या व्यक्तीला पुरेशा लांब काळापासून ओळाखतो एवढे पुरेसे नाही.
४) ओळख देणाऱ्या व्यक्तीला काही दर्जा असावा व त्याचे त्या बँकेत सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ खाते असावे. त्यामुळे ह्याची खात्री होईल की नूतन खातेदाराने किंवा जेमतेम अथवा लहान रक्कम शिल्लक ठेवणाऱ्याच्या ओळखीने खाते उघडण्यात आले नाही.ह्या विहित कालावधीमुळे ओळख देणाऱ्याच्या खात्यावर बँकेला देखरेख करता येऊन ते खाते समाधानकारक असल्याबाबत बँकेची खात्री होईल.
५) शाखा व्यवस्थापक/ कर्मचारी वर्ग ह्यांना ओळख देण्यापासून परावृत्त करावे.
६) जेथे तो पक्ष सावधानकारक ओळख देऊ शकत नसेल, तेथे खाते उघडण्याची परवानगी देण्यापूर्वी त्याच्या पूर्वेतिहासाबाबत पुरेसा पुरावा सादर करण्याचा आग्रह धरावा.
७) चांगल्या लौकिकांच्या ग्राहकांना, नूतन पक्षांना ओळखत नसतानाही त्यांची ओळख करुन देण्यामधील धोक्यांची जाणीव करुन द्यावी.
८) ज्या ग्राहकांच्या बाबतीत त्यांचा पगार जमा होत असून सरकारी/निमसरकारी संस्था/व्यक्ती ह्यांना चेकने प्रदान केले जात असल्यास फक्त एका फोटोसह ओळख दिल्यास चालेल.
९) प्रेषण व्यवहार करण्यासाठी आणि धंद्यानिमित्त सोडल्यास मोठ्या रकमांचे चेक्स गोळा करण्यासाठीच उपयोग केला जाण्याची शक्यता असलेल्या खात्यांच्या बाबतीत, बँकेकडून अधिक खोलात चौकशी केली जाणे आवश्यक आहे.

## २.१.३ गैरहजेरीने दिलेली ओळख

एखाद्या खात्याच्या बाबतीत ओळख देणारा शाखेत त्यासाठी प्रत्यक्ष आला नसल्यास, त्याने एका नव्या खात्यासाठी ओळख दिली आहे ह्यासाठी त्याच्याकडून लेखी दुजोरा घेतला जावा.

`ओळखीसाठी जेथे खाते उघडण्याच्या फॉर्मवर त्या बँकेच्या अन्य शाखांचे मॅनेजर/अधिकारी ह्यांच्या सह्या असतात तेथे, बँकेच्या रेकॉर्डमधील त्या अधिकाऱ्यांच्या नमुना सह्यांबरोबर फॉर्मवरील सह्या पडताळून पाहण्याबरोबरच, त्या शाखांमधील ओळख देणाऱ्या अधिकाऱ्यांकडूनही ह्याबाबत लेखी दुजोरा घ्यावा. असा दुजोरा प्राप्त होईपर्यंत त्या नवीन खात्यासाठी चेक्स/ड्राफ्ट्स गोळा करु नये.
ओळख देणारे, त्याच बँकेच्या शाखांमधील अधिकारी नसून, बँकेत ओळख देण्यास प्रत्यक्ष न आलेले असे असल्यासही हीच कार्यरीत अनुसरावी.
बँकेनेही अशा ग्राहकांना तसेच ओळख देणारांना पोस्टाने पत्रे पाठवून असे खाते उघडण्याबाबत/ओळख देण्याबाबत त्यांचा दुजोरा घ्यावा.

## २.२ खातेदारांची छायाचित्रे

### २.२.१ छायाचित्रे मिळविण्याबाबत अपरिहार्यता

१) सर्व नवी खाती उघडताना, बँकांनी, ती खाती चालविण्यास प्राधिकृत असलेल्या ठेवीदारांची/खातेदारांची छायाचित्रे मिळवावीत. ग्राहकाची छायाचित्रे ही अलिकडील असावीत आणि खाते उघडण्याच्या फॉर्मवर चिकटवायच्या अशा छायाचित्रांचा खर्च ग्राहकानेच करावयाचा आहे.

२) छायाचित्रांचा केवळ एकच संच घेतला जावा आणि प्रत्येक प्रकारच्या ठेवीसाठी निराळ्या छायाचित्रांचा आग्रह धरला जाऊ नये.निरनिराळ्या प्रकारच्या ठेवींसाठी असलेल्या अर्जांना योग्य तो संदर्भ देण्यात यावा.

३) बचत खाते व चालु खाते ह्यासारखी खाती चालविणाऱ्या प्राधिकृत व्यक्तींची छायाचित्रे मिळवावीत. अन्य ठेवींबाबत, उद्यस्थिर/आवर्ती, संचयी इत्यादी - ती ठेव ज्यांच्या नावे आहे त्या सर्व ठेवीदारांची छायाचित्रे घेण्यात यावीत. ह्याला अपवाद म्हणजे अल्पवयीत व्यक्तींच्या बाबतीत त्यांच्या पालकांची छायाचित्रे घेतली जावीत.

४) बँकांनी "पर्दानशीन" स्त्रियांचीही छायाचित्रे मिळवावीत.

५) बँकांनी, एनआरई, एनआरओ, एफसीएनआर खातेदारांचीहि छायाचित्रे मिळवावीत.

खाते चालविले जात असताना, सर्वसाधारणतः, बँकांनी, तशीच परिस्थिती असल्याशिवाय खातेदाराच्या उपस्थितीचा आग्रह धरु नये. नमुना सह्यांच्या जागी/बदली छायाचित्रे चालणार नाहीत.

### २.२.२ अपवाद

१) खाली दिलेल्या बाबतीत बँकांनी छायाचित्रांचा आग्रह धरु नये.

अ) चेकची सुविधा दिली न गेलेली नवीन बचत खाती आणि

ब) रु. १०,००० व त्यापर्यंतच्या रकमेच्या स्थिर व मुदत ठेवी.

२) तथापि अशी खाती उघडण्याबाबत बँकांनी नेहमीच्या व आवश्यक सावधानता/पूर्वदक्षता घ्याव्यात.

३) जेथे एखाद्या ठेवीदाराची रु १०,०००/- पेक्षा कमी रकमेची ठेव असून त्याचे/तिचे चेक सुविधेसह बचतखाते किंवा चालु खाते असेल तेथे त्या ठेवीदाराचे छायाचित्र मिळविणे आवश्यक आहे.

४) बँका, स्थानिक प्राधिकरणे व सरकारी विभाग (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा निमसरकारी संस्था सोडून) ह्यांना छायाचित्रे देण्याच्या बाबतीत सूट देण्यात आली आहे.

५) कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट इत्यादी कर्ज खात्यांच्या बाबतीत छायाचित्रे मिळविण्याची आवश्यकता नाही.

७) कर्मचारी वर्गाच्या खात्यांबाबत (एकमेव/संयुक्त) बँकांना छायाचित्रांचा आग्रह धरु नये.

## २.३ खातेदारांचा पत्ता

तत्वशून्य व्यक्तींकडून कर बुडविण्या/टाळण्यासाठी स्वतःच नकळत उपयोग केला जाणे हे बँकांसाठी योग्य नाही. ह्यासाठी, बँकांनी त्यांच्या ठेवीदारांचा संपूर्ण पत्ता मिळवावा व तो खाते उघडण्याच्या फॉर्मवर तसेच रेकॉर्डमध्ये नोंदवून ठेवावा. त्यामुळे गरज भासल्यास त्यांना विनात्रास शोधता येईल. सर्वच प्रकरणांमध्ये खातेदाराच्या पत्त्याचा स्वतंत्र असा दुजोरा मिळविला जावा.

## २.४ अन्य सुरक्षा उपाय

### २.४.१ पॅन/जीआयआर क्रमांक

रु ५०,००० व त्यावरील रकमेची सुरुवातीलाच जमा करुन खाते उघडणाऱ्या ठेवीदाराचा पॅन/जीआयआर क्रमांक मिळविणे बॅंकांसाठी आवश्यक आहे.

### २.४.२ प्राधिकृतीकरण

शाखा प्रबंधक किंवा मोठ्या शाखांमधील संबंधित ठेव खात्यांचा प्रभारी अधिकारी हेच नवीन खाती उघडण्यास प्राधिकृत असावेत.

### २.४.३ तांत्रिक बाजूंची पूर्तता

बॅंकांनी खात्री करुन घ्यावी की, खाते उघडण्याबाबतच्या सर्व बाबी बॅंकेच्या कार्यालयातच केल्या जातील व कोणतेही कागदपत्र अंमलबजावणीसाठी बाहेर नेले जाणार नाहीत. वरील नियमाला अपवाद करणे आवश्यक असल्यास तपशील पडताळून पाहण्यास अधिकारी पाठविणे, योग्य प्रकारे तयार केलेल्या पडताळणी कागदावर स्वाक्षरीयुक्त छायाचित्र मिळविणे, रजिस्टर्ड एडीने पाठविणे, खात्यात कोणतेही व्यवहार केले जाण्यापूर्वी ग्राहकाला खाते उघडण्याचा फॉर्म सूचनांसह पाठविणे इत्यादींसाठी पूर्वदक्षता घेण्यास अधिकारी पाठवू शकतात.

### २.४.४ चालु खाते उघडणे - शिस्त असण्याची आवश्यकता

बॅंकांचा एनपीए स्तर कमी होण्यासाठी आवश्यक असलेल्या शिस्तीचा विचार करता, बॅंकांनी त्यांच्या खातेदारांकडून एक घोषणापत्र घेण्याचा आग्रह धरावा की, तो ग्राहक अन्य कुठल्याही बॅंकेच्या कर्ज सुविधेचा लाभ घेत नाही किंवा त्याने अन्य बॅंकांच्या घेतलेल्या कर्ज सुविधांचा तपशील द्यावा. खाते उघडणाऱ्या बॅंकेने सर्व माहितीची पडताळणी करावी आणि संबंधित/कर्जदायी बॅंकांना कळवावे. खाते उघडण्याऱ्या बॅंकेने अशा बॅंकांकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवावे.

तथापि, किमान एका पंधरवड्याच्या आत ह्याबाबत कोणतेही उत्तर न आल्यास, बॅंका त्या भावी ग्राहकांची चालु खाती उघडू शकतात.

ह्याशिवाय, कॉर्पोरेट ग्राहक असलेल्या किंवा एकापेक्षा अधिक बॅंकांकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज सुविधा मिळालेल्या भावी ग्राहकाच्या विनंतीवरुन कष्टपूर्वक चौकशी करुन, कॉन्सॉर्टियमखाली असल्यास त्यातील मुख्य बॅंकेला, व बहु बॅंकीय व्यवस्थेखाली असल्यास संबंधित बॅंकांना त्याबाबत कळविले जावे.

ह्याबाबतीत परिणामकारक अशा कष्टपूर्वक चौकशीची, तसेच ग्राहकाबाबत समाधान होण्याबाबतची गरज असल्याचे लक्षात घेऊन बॅंकांनी खात्री करुन घ्यावी की, त्यांचेकडे इतर बॅंकांकडून आलेल्या संदर्भाची दखल घेण्यात सुयोग्य अशा व्यवस्था आहेत.

### २.४.५ आर्थिक समावेश

प्राथमिक (नागरी) सहकारी बॅंकांचा, त्यांच्या कार्यक्षेत्रामधील पायाभूत व परवडण्यायोग्य अशा सेवा देण्याबाबतची भूमिका ओळखता, असे दिसून येते की, काही युसीबींमध्ये किमान शिल्लक

रक्कम ठेवण्याबाबतच्या आवश्यकता अजूनही लोकसंख्येच्या बऱ्याच मोठ्या भागाला, खाते उघडणे/चालविणे ह्यापासून वंचित करत आहेत.
अधिकतर आर्थिक समावेश होण्याच्या दृष्टिकोनातून, सर्व युसीबींना सूचित करण्यात येते की, त्यांनी **बेसिक बँकिंग " नो-फ्रिल्स" खाते**, 'शून्य' किंवा अत्यंत कमी किमान शिल्लकेचे खाते, तसेच, जास्तीत जास्त लोकसंख्येला अशा खात्यांचा लाभ घेता यावा म्हणून किमान आकार असलेले व्यवहार सुरु करावेत. अशा खात्यातील व्यवहारांचे स्वरुप व संख्या मर्यादित ठेवता येईल, पण त्याबाबत ग्राहकांना पारदर्शकतेने माहित करुन दिली जाईल. सर्व युसीबींना सांगण्यात येते की त्यांनी अशा नो-फ्रिल्स खाते सुविधेला मोठी प्रसिध्दी द्यावी, तसेच ह्या सुविधेबाबतची माहिती त्यांच्या वेबसाईटवरही सुविधांसह व आकारांसह पारदर्शकतेने प्रदर्शित करावी. तथापि, देशाच्या दूरदूरच्या कोपऱ्यापर्यंत बँका पोहचणार नाहीत तो पर्यंत आर्थिक समावेशाची उद्दिष्टे संपूर्णपणे साध्य होणार नाहीत. आणि हे सर्व परवडेल अशा पायाभुत सोयी आणि सुयोग्य अशा तंत्रज्ञानाचा उपयोग करुन कार्यकारी खर्च/किंमत कमी केल्यानेच साध्य होणार आहे. ह्यामुळे छोटेखानी व्यवहार सफलक्षम व्हावेत ह्यासाठी व्यवहार-खर्च कमी करण्यास बँकांना मदतच होईल. ह्यासाठी बँकांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सुयोग्य तंत्रज्ञानाचा वापर करुन, आर्थिक समावेशाबाबतचे प्रयत्न अधिकतर करावेत. ह्यात काळजी घेतली जावी की, विकसित केलेले उपाय हे सुरक्षित, तपासणी करण्याजोगे असतील. आणि बँकांनी, इतर कार्यरत केलेल्या निरनिराळ्या प्रणालींमध्ये आंतर-कार्यकारिता येण्यासाठी, सर्वस्वीकृत मानकांचे अनुसरण करावे.

## २.५ एनआरओ/एनआरई खाती उघडणे

२.५.१ विद्यमान निवासी खातेदार अनिवासी झाल्यावर निर्माण झालेल्या बदलामुळे बँका एनआरओ खाती ठेवू शकतात. आणि केवळ अशा खात्यांमध्येच, व्याजाची नियतकालिक जमा करण्यास परवानगी आहे. युसीबींना नवीन एनआरओ खाती उघडण्यासाठी परवानगी नाही (वर्ग १ प्राधिकृत डीलर्स सोडून)

२.५.२ पर्यवेक्षण आणि विनियामक समन्वयासाठी रिझर्व बँकेशी मेमोरँडम ऑफ अंडरस्टँडिंग (एमओयु) खाली करार केलेल्या राज्यांमध्ये नोंदणी झालेल्या आणि मल्टि स्टेट को ओपरेटिव सोसायटीज् अधिनियम, २००२ खाली नोंदणी झालेल्या आणि पुढील निकषांचे पालन करणाऱ्या युसीबीज्, एनआरई खाती ठेवण्यास प्राधिकृत आहेतः-

१) किमान निव्वळ मूल्य रु २५ कोटी असल्यास.
२) ९% कमी नसलेला सीआरएआर असल्यास.
३) निव्वळ एनपीए ९% पेक्षा कमी असल्यास.
४) सीआरआर/एसएलआरचे पालन झाले असल्यास.
५) मागील ३ वर्षात कोणतेही संचित तोटे नसून नफा झाला असल्यास.
६) अंतर्गत नियंत्रण प्रणाली सुदृढ असल्यास.
७) केवायसी/एएमएल मार्गदर्शक तत्वांचे समाधानकारक पालन.
८) मंडळावर किमान दोन व्यवसायिक संचालक असल्यास.

# ३ काही विशिष्ट प्रकारची ठेव खाती उघडण्यावरील निर्बंध

## ३.१ लॉक-इन काल असलेल्या ठेव योजना

रिझर्व बँकेच्या नजरेस आणण्यात आले आहे की, काही बँका नियमित मुदत ठेवींच्या व्यतिरिक्त, ३०० दिवस ते पाच वर्षांपर्यंतच्या खास मुदतीच्या, पुढील गुणविशेष असलेल्या खास ठेव योजना देऊ करत आहेत.

१) ६ ते १२ महिने पर्यंत लॉक - इन काल.

२) ह्या लॉक-इन कालामध्ये मुदतपूर्व निकासी करण्यास परवानगी नाही.व कोणतेही व्याज दिले जात नाही.

३) ह्या ठेवींवर दिले जाणारे व्याजदर, नेहमीच्या/सर्वसामान्य ठेवींवरील व्याज दरांनुसार नसतात.

४) काही बँकांद्वारे काही विशिष्ट अटींवर अंशतः पूर्वप्रदान केले जाते.

आपल्या संचालक मंडळाच्या मंजुरीने, नवीन देशांतर्गत ठेवी प्रसिध्दी योजना सुरु करण्यापूर्वी, युसीबींनी खात्री करुन घ्यावी की, आरबीआयने वेळोवेळी दिलेल्या, ठेवींवरील व्याजदर, मुदत ठेवींची मुदतपूर्व निकासी, मुदत ठेवींच्या विरुध्द कर्जे/अग्रिम राशी देण्याबाबतची मंजुरी, इत्यादींबाबतच्या निदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आहे. ह्याबाबत केलेल्या उल्लंघनाची गंभीर दखल घेतली जाईल व बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (एएसीएस) खाली दंड भरावा लागेल. येथे स्पष्ट करण्यात येते की, काही बँकांनी उभ्या केलेल्या, लॉकइन काल व वरील इतर लक्षणे असलेल्या खास योजना ह्या रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनांनुसार नाहीत. ज्यांनी अशा योजना सुरु केल्या आहेत अशा बँकांना त्या ताबडतोब बंद करण्यास व तसे केल्याबाबत, रिझर्व बँकेच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला कळविण्यास सांगण्यात येत आहे.

## ३.२ आई पालक असलेले अल्पवयीन व्यक्तीचे खाते

३.२.१ सर्वसाधारणतः आई पालक असलेल्या अल्पवयीन व्यक्तीचे ठेव खाते उघडण्यास बँका तयार होत नाहीत. असे समजले जाते की, वडील जिवंत असताना, आईच्या पालकत्वाखाली खाते उघडण्यास नाराजीचे कारण हे, हिंदु मायनॉरिटी अँड गार्डियनशीप अधिनियम, १९५६ च्या कलम ६ वर आधारित आहे. त्या कलमानुसार, एखाद्या हिंदु अल्पवयीनाचा पिता हाच त्याचा नैसर्गिक पालक आहे.

३.२.२ ह्या प्रश्नाच्या कायदेशीर व व्यावहारिक बाजूंची आरबीआयने तपासणी केली आहे. कायद्यामधील तरतुदींचा विचार न करता, केवळ स्थिर, आवर्ती ठेवी आणि बचत खाती उघडण्याबाबत, मातांना पालक समजण्यामागील संकल्पना मान्य केल्यास, अशी खाती बँका उघडू शकतात. मात्र त्यासाठी त्यांनी सावधानता ठेवावी की, माता पालक असलेल्या अल्पवयीन व्यक्तीच्या खात्यामधून शिल्लकेपेक्षा अधिक रक्कम काढली जाणार नाही व त्यात सदैव जमा रक्कम असेल ह्याची त्यांनी खात्री करुन घ्यावी. अशा प्रकारे, अल्पवयीन व्यक्तीची कंत्राट - करण्याच्या क्षमतेबाबत वाद निर्माण होणार नाहीत.

३.२.३ ह्याशिवाय, संबंधित रक्कम मोठी असल्यास व ती अल्पवयीन व्यक्ती व्यवहाराचे स्वरुप समजण्याएवढी मोठी असल्यास, अशा खात्यांमधून रक्कम काढतेवेळी बँकांनी त्याचीही संमती घ्यावी.

## ४) नामनिर्देशन सुविधा

### ४.१ कार्यकारी सूचना

१) निरनिराळ्या बँकांनी ठेवी-खात्यांना कोणतीही नावे दिली असली तरी सर्व प्रकारच्या ठेवी-खात्यांना नामनिर्देशन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) ग्राहकाने नामनिर्देशन करण्यास नकार दिल्याचे सोडल्यास (अनुपालन न केल्याचा दोष टाळण्यासाठी हे नोंद केले जावे) सर्व विद्यमान व नवीन खात्यांबाबत, नामनिर्देशन करणे हा एक नियम केला जावा.
३) पेन्शन जमा करण्यासाठी उघडलेल्या बचत खात्यांसाठी नामनिर्देशन सुविधा उपलब्ध आहे. तथापि, को-ऑपरेटिव सोसायटीज (नॉमिनेशन) नियम, १९८५ हे, अरिअर्स ऑफ पेन्शन (नॉमिनेशन) नियम १९८३ पेक्षा अधिक स्पष्ट/निराळे आहेत, आणि ह्या १९८३च्या नियमांखाली पेन्शनची थकबाकी मिळविण्यासाठी, पेन्शनराने केलेले नामनिर्देशन हे, त्या पेन्शनराने नामनिर्देशन सुविधा घ्यावयाचे ठरविल्यास, त्या पेन्शनराने बँकेत ठेव ठेवण्यासाठी उघडलेल्या खात्यासाठी असलेल्या, कोऑपरेटिव सोसायटी (नॉमिनेशन) नियम १९८५ अन्वये आवश्यक असलेल्या वेगळ्या नामनिर्देशनाला लागु नाहीत.
४) बँकांना सांगण्यात येते की त्यांनी सर्वसाधारणतः जमाखाते उघडणाऱ्या ग्राहकाजवळ नामनिर्देशन आग्रह धरावा. खाते उघडणाऱ्या ग्राहकाने नामनिर्देशनासाठी नकार दिल्यास, बँकांनी नामनिर्देशनाचे फायदे समजावून सांगावेत. तरीही त्याने नकार दिल्यास, त्याला नामनिर्देशन करावयाचे नाही अशा अर्थाचे पत्र त्याने बँकेला द्यावे. आणि असे पत्र देण्यासही त्याने नकार दिल्यास, व तो अन्यथा खाते उघडण्यास पात्र असल्यास, खाते उघडण्याच्या फॉर्मवर नोंद करावी. केवळ नामनिर्देशन करण्यास नकार दिल्याच्या कारणाने, बँकेने, कोणत्याही परिस्थितीत खाते उघडण्यास नकार देऊ नये. एकमेव मालक असलेल्या कंपनीच्या बाबतीतही हीच कार्यरीत अवलंबिली जावी.

### ४.२ अधिनियमाच्या तरतुदी

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (सहकारी सोसायट्यांना लागु असल्यानुसार) च्या कलम ४५ झेडए ते ४५ झेडएफ मधील तरतुदींमध्ये इतर बाबींसह पढील बाबी आहेतः
१) मृत ठेवीदाराच्या नामनिर्देशिताला, त्या ठेवीदाराच्या नावे जमा असलेल्या रकमेचे प्रदान करण्यास, सहकारी बँकेला साह्य करणे.
२) मृत व्यक्तीने बँकेच्या सेफ कस्टडीमध्ये ठेवलेल्या वस्तूंची, रिझर्व बँकेने निर्देशित केलेल्या रितीने यादी करुन, त्या नामनिर्देशिताला परत करण्यासाठी सहकारी बँकेला साह्य करणे.
३) बँकेचे सेफ्टी लॉकर भाड्याने घेणारी व्यक्ती मृत झाल्यावर, त्या लॉकरमधील वस्तूंची, रिझर्व बँकेने निर्देशित केलेल्या रितीने यादी तयार करुन, त्या वस्तू नामनिर्देशिताला देण्यासाठी सहकारी बँकेला मदत करणे.

### ४.३ नियम

सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम, १९८५ मध्ये पुढील तरतुदी आहेतः
१) ठेवी खात्यांसाठी, सेफ कस्टडीत ठेवलेल्या वस्तू, आणि सेफ्टी लॉकर्समध्ये ठेवलेल्या वस्तूंसाठी नामनिर्देशन फॉर्म्स.
२) नामनिर्देशनाचे रद्दीकरण व बदल करण्यासाठी फॉर्म्स.
३) नामनिर्देशनाचे पंजीकरण, रद्दीकरण व बदल आणि त्यासंबंधीच्या बाबी.

जमा/ठेवी खात्यांबाबतच्या नामनिर्देशन नियमांमध्ये पुढील तरतुदी आहेतः

- एखाद्या सहकारी बँकेमध्ये, ठेवलेल्या ठेवीबाबत, एका किंवा सर्व ठेवीदारांनी एकत्रितपणे येऊन, एका किंवा अधिक व्यक्तींच्या नावे करावयाचे नामनिर्देशन.
- वरील नामनिर्देशन ती ठेवी ठेवीदाराच्या वैय्यक्तिक क्षमतेत असल्यासच, पण एखादे पद किंवा अन्यथा असलेल्या प्रतिनिधिक क्षमतेत नसल्यासच करता येईल.
- जेथे नामनिर्देशित एक अल्पवयीन व्यक्ती असेल तेथे, एक किंवा सर्व ठेवीदार एकत्रित येऊन, तो ठेवीदार किंवा सर्व ठेवीदार मृत झाल्यास, त्या नामनिर्देशिताच्या अल्पवयीन असण्याच्या काळात, अल्पवयीन नसलेल्या दुसऱ्या एका व्यक्तीची नेमणुक, त्या ठेवीची रक्कम मिळविण्यास करु शकतात.
- एखाद्या अल्पवयीन व्यक्तीच्या नावे ठेवलेल्या ठेवीबाबत, त्यासंबंधी केलेले नामनिर्देशन, त्या अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने काम करण्यास कायद्याने पात्र असलेल्या व्यक्तीद्वारेच केले जाईल.
- ठेवीदार किंवा सर्व ठेवीदार एकत्रित येऊन/मिळून केलेले अशा नामनिर्देशनाचे रद्दीकरण.
- ठेवीदार किंवा सर्व ठेवीदार मिळून केलेला अशा नामनिर्देशिनातील बदल.
- असे नामनिर्देशन फक्त एकाच व्यक्तीच्या नावे करता येईल.
- एखाद्या सहकारी बँकेत, एका किंवा अनेक ठेवीदारांनी मिळून ठेवलेली ठेव त्या बँकेत असण्याच्या कालावधीतच, वरीलप्रमाणे नामनिर्देशन, नामनिर्देशनाचे रद्दीकरण किंवा त्यात बदल करता येईल.
- एखादी ठेव एकापेक्षा अधिक ठेवीदारांच्या नावे असल्यास, नामनिर्देशनाचे रद्दीकरण किंवा त्यातील बदल, तोपर्यंत वैध समजला जाणार नाही, जोपर्यंत, त्या नामनिर्देशनाचे रद्दीकरण किंवा बदल करतेवेळी जिवंत असलेल्या सर्व ठेवीदारांनी तो केलेला नसेल.
- एखाद्या ठेवीच्या बाबतीत, संबंधित सहकारी बँक, संबंधित असा नामनिर्देशनाचा, रद्दीकरणाचा किंवा बदलाचा फॉर्म संपूर्ण भरणाऱ्या संबंधित ठेवीदाराला किंवा ठेवीदारांना त्याबाबत लेखी पोच देईल.
- नामनिर्देशनाचा, किंवा रद्दीकरणाचा किंवा बदलाचा संपूर्ण भरलेला फॉर्म, त्या सहकारी बँकेच्या पुस्तकात पंजीकृत केला जाईल.
- त्या ठेवीचे नूतनीकरण करण्यात आल्याच्या कारणाने, त्याबाबतचे नामनिर्देशन रद्दीकरण किंवा बदल जारी असणे संपणार नाही.

## ४.४ नामनिर्देशनाचा अभिलेख (रेकॉर्ड)

### ४.४.१ नामनिर्देशनाची पोचपावती

बँकांना माहितच आहे की, सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम, १९८५ च्या नियम २(९), ३(८) आणि ४(९) अनुसार, त्यांना, ठेवीदार/लॉकर भाड्याने घेणारे ह्यांना, नामनिर्देशन, रद्दीकरण आणि/किंवा बदल ह्याबाबतच्या संपूर्ण भरलेल्या फॉर्म्सची लेखी पोचपावती देणे आवश्यक आहे. बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (एएसीएस) आणि सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम, १९८५ च्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे आणि त्याचबरोबर, संपूर्ण भरलेल्या नामनिर्देशन, रद्दीकरण आणि/किंवा त्यातील बदलाच्या फॉर्म्सची

पोच द्यावी. ग्राहकाने अशी पोच मागितली असो अथवा नसो, सर्व ग्राहकांना अशी पोच दिली जावी. ह्याशिवाय, "नॉमिनेशन रजिस्टर्ड" ह्या शीर्षकाव्यतिरिक्त, ग्राहकाची संमती असल्यास, पासबुक/ खाते विवरणपत्रे/एफडीआर ह्यावरही नामनिर्देशिताचे नाव घातले जावे.

**४.४.२ नामनिर्देशनाचे पंजीकरण/नोंदणी**

नियम २(१०), ३(९), ४(१०) अनुसार बँकेने तिच्या पुस्तकात, नामनिर्देशन, रद्दीकरण आणि/किंवा त्यातील बदल नोंदविणे आवश्यक आहे. त्यानुसार बँकांनी त्यांच्या ठेवीदारांनी, लॉकर भाड्याने घेणारांनी केलेले नामनिर्देशन, रद्दीकरण किंवा त्यातील बदल नोंदविण्याची कारवाई करावी.

नामनिर्देशनाची नोंदणी करतेवेळी पुढील बाबींचे पालन केले जावेः-

१) नामनिर्देशनाचा फॉर्म घेण्याबरोबरच, बँका, खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये नामनिर्देशिताचे नाव व पत्ता ह्यासाठी जागा ठेवू शकतात. ग्राहकाकडे पोहोचणाऱ्या अन्य साहित्यावर, तसेच चेकबुक, पासबुक ह्यांच्यावर छापण्यासह, नामनिर्देशन सुविधेबाबत प्रसिध्दि देणे गरजेचे आहे. तसेच ही सुविधा लोकप्रिय करण्यासाठी नियतकालिक मोहिमही सुरु करण्यात यावी.
२) संयुक्त ठेवींच्या बाबत, एका ठेवीदाराचा मृत्यु झाल्यानंतर, असलेल्या नामनिर्देशनात अन्य जीवित ठेवीदारांद्वारे एकत्रितपणे बदल/रद्दीकरण करण्यास बँका परवानगी देऊ शकतात."कोणीही एक किंवा जीवित व्यक्ती" अशा कार्यकारी सूचनांच्या ठेवींबाबतही हे लागु आहे. येथे नोंद घ्यावी की, संयुक्त ठेव खात्याच्या बाबतीत, सर्व ठेवीदार मृत झाल्यानंतरच नामनिर्देशिताचा हक्क अस्तित्वात येतो.
३) "नामनिर्देशन पंजीकृत" असे पासबुकच्या दर्शनी पृष्ठावर लिहून, नामनिर्देशन सुविधा घेतली असल्याची रीत बँका सुरु करु शकतात.

**४.५ सेफ कस्टडीमधील वस्तूंबाबत नामनिर्देशन सुविधा**

**४.५.१ कायदेशीर तरतुदी**

सेफ कस्टडीमध्ये ठेवलेल्या वस्तु नामनिर्देशिताला परत देण्यासाठी असलेल्या नामनिर्देशनासाठीच्या व इतर व्यक्तींद्वारे केलेल्या दाव्यांबाबतच्या तरतुदी कलम ४६ झेडसी मध्ये दिल्या आहेत.

**४.५.२ सेफ कस्टडीमधील वस्तूंबाबत नामनिर्देशिताचे नियम**

सेफ कस्टडीमधील वस्तूंबाबत नामनिर्देशिताचे नियम तरतुदी पुढील प्रमाणे आहेतः-

अ) एखाद्या सहकारी बँकेमध्ये सेफ कस्टडीमध्ये ठेवलेल्या वस्तूंच्या बाबतीत एखाद्या व्यक्तीने (ह्यानंतर ह्याला "ठेवीदार" असे म्हणण्यात आले आहे) करावयाचे नामनिर्देशन.
ब) जेथे नामनिर्देशित हा अल्पवयीन आहे तेथे, त्या नामनिर्देशिताच्या अल्पवयीन कालामध्ये ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, नामनिर्देशिताच्या वतीने त्या वस्तू स्वीकारण्यासाठी तो ठेवीदार अल्पवयीन नसलेली दुसरी व्यक्ती नेमू शकतो.

क) जेथे एखाद्या सहकारी बँकेत एखाद्या अल्पवयीन व्यक्तीच्या नावे सेफ कस्टडीत ठेवल्या असतात तेथे त्या अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने कायदेशीरपणाने काम करणाऱ्या व्यक्तीकडून नामनिर्देशन केले जाईल.
ड) नामनिर्देशन हे केवळ एकच व्यक्तीच्या नावे केले जावे.
ई) सहकारी बँकेने सेफ कस्टडीमध्ये वस्तू ठेवल्या असलेल्या काळात, कोणत्याही वेळी, ठेवीदार नामनिर्देशनाचे रद्दीकरण किंवा त्यात बदल करु शकतो.
फ) अशा ठेवलेल्या वस्तूंबाबत, त्या सहकारी बँकेने, नामनिर्देशनाचा किंवा त्याच्या रद्दीकरणाचा किंवा त्यातील बदलाचा पूर्ण केलेला फॉर्म दाखल केल्याबाबत, त्या ठेवीदाराला लेखी पोच दिली पाहिजे.
ग) नामनिर्देशनाचा किंवा त्याच्या रद्दीकरणाचा किंवा त्यातील बदलाचा पूर्ण केलेला व सहकारी बँकेत दाखल केला फॉर्म, त्या सहकारी बँकेच्या पुस्तकात पंजीकृत केला पाहिजे.

### ४.५.३ कार्यकारी सूचना

१) नामनिर्देशन सुविधा फक्त वैय्यक्तिक ठेवीदारांसाठीच उपलब्ध आहे - सेफ कस्टडीमध्ये संयुक्तपणे वस्तु ठेवणाऱ्या व्यक्तींसाठी नाही.
२) नामनिर्देशित आणि जीवित वारस ह्यांना सेफ कस्टडीत ठेवलेल्या वस्तू परत करतेवेळी , बँकांना त्यातील सीलबंद केलेली पाकिटे उघडण्याची गरज नाही.
३) मृत ठेवीदाराने सेफ कस्टडीत ठेवलेल्या वस्तू नामनिर्देशिताला परत करण्याबाबत, रिझर्व बँकेने, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ४५ झेडसी (३) व ४५ झेड ई (४) व कलम ५६ अनुसार ह्यासाठी नमुने विहित केले आहेत.
४) सेफ कस्टडीतील वस्तु, खऱ्या नामनिर्देशकालाच परत केल्या गेल्याची खात्री करुन घेण्यासाठी, तसेच मृत्यूचा पुरावा पडताळून पाहण्यासाठी, सहकारी बँकांनी, त्यांचे स्वतःचे हक्काबाबतचे नमुने, किंवा ह्यासाठी फेडरेशन/असोशिएशन किंवा इंडियन बँक असोशिएशनने सुचविलेले नमुने वापरावेत.ठेवीदाराच्या मृत्युच्या पुराव्याबाबत, आयबीएने सांगितले आहे की तिच्या सभासद बँकांनी, बँकांमध्ये प्रचलित असलेल्या कार्यरीतीं अवलंब करावा. उदा. मृत्युचे प्रमाणपत्र किंवा मृत्युबाबत अन्य कोणताही समाधानकारक पुरावा.

## ४.६ सेफ डिपॉझिट लॉकर खात्यांबाबतचे नामनिर्देशन

### ४.६.१ वैधानिक तरतुदी

सेफ्टी लॉकर्स बाबतचे नामनिर्देशन आणि त्यामधील वस्तू नामनिर्देशिताला परत करणे व त्याबाबत इतर व्यक्तींद्वारे करण्यात आलेले दावे ह्यासंबंधीच्या कायदेशीर तरतुदी ह्या अधिनियमाच्या कलम ४५ झेडई व ४५ झेडएफमध्ये सविस्तर आल्या देण्यात आहेत.

### ४.६.२ सेफ्टी लॉकर संबंधीचे नामनिर्देशन नियम

सेफ्टी लॉकरबाबतच्या नामनिर्देशनाच्या नियमांमध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी आहेतः-
अ) एखाद्या सहकारी बँकेकडून दोन किंवा अधिक व्यक्तींद्वारे संयुक्तपणे लॉकर भाड्याने घेतला असेल तेथे, अशा व्यक्तींनी करावयाचे नामनिर्देशन.
ब) जेथे केवळ एकमेव व्यक्तीने लॉकर भाड्याने घेतला असेल, तेथे त्याबाबतचे नामनिर्देशन केवळ एकाच व्यक्तीच्या नावे केले जाईल.

क) जेथे एखाद्या अल्पवयीन व्यक्तीच्या नावे लॉकर भाड्याने घेतला असेल, तेथे करावयाचे नामनिर्देशन, त्या अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने काम करण्यासाठी कायद्याने प्राधिकृत व्यक्तीद्वारे केले जाईल.
ड) लॉकर भाड्याने घेणाऱ्या एकमेव व्यक्तीने किंवा संयुक्तपणे केलेल्या नामनिर्देशनाचे रद्दीकरण.
ई) लॉकर भाड्याने घेणाऱ्या एकमेव व्यक्तीने किंवा संयुक्तपणे केलेल्या नामनिर्देशनात बदल.
फ) लॉकर संयुक्तपणे भाड्याने घेणाऱ्या व्यक्तींनी केलेल्या नामनिर्देशनात बदल.
ग) लॉकर भाड्याने दिला गेला असल्याच्या कालावधीत, कोणत्याही वेळी एखादे नामनिर्देशन किंवा त्याचे रद्दीकरण किंवा त्यात बदल करता येईल.
ह) सहकारी बँक, लॉकर भाड्याने घेणारी एकमेव किंवा व्यक्ती किंवा संयुक्तपणे भाड्याने घेणाऱ्या व्यक्ती ह्यांना, नामनिर्देशन किंवा त्याचे रद्दीकरण किंवा त्यातील बदल ह्यासाठी पूर्ण केलेला फॉर्म सादर केल्याबाबत लेखी स्वरुपात कळवील.
आय) नामनिर्देशन किंवा त्याचे रद्दीकरण किंवा त्यातील बदल ह्या बाबतचा, पूर्ण केलेला व सहकारी बँकेकडे सादर केलेला फॉर्म, त्या बँकेच्या पुस्तकात नोंदवला जाईल.

### ४.६.३ कार्यकारी सूचना

१) नामनिर्देशितांना लॉकरपर्यंत प्रवेश देणे व त्याला/त्यांना त्यामधील वस्तू काढण्याास परवानगी देणे ह्याबाबत, भारतीय रिझर्व बँकेने, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ४५ झेडसी(३) व ४५ झेडई(४) तसेच ५६ अनुसार नमुने/स्वरुप विहित केले आहेत.

२) सेफ कस्टडीमध्ये ठेवलेली रक्कम व वस्तू, खऱ्या नामनिर्देशितालाच परत केल्या जातील ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, बँका, वरील परिच्छेद ४.५.३ (४) मध्ये निर्देशित केलेली कार्यरीत अवलंबू शकतात.

३) नामनिर्देशितांना, किंवा जीवित वारसांना, लॉकरमधील वस्तू परत करताना बँकांना त्या लॉकरमधील सील-बंद पाकिटे उघडण्याची आवश्यकता नाही.

४) संयुक्तपणे भाड्याने घेतलेल्या लॉकर्सच्या बाबतीत, ते संयुक्तपणे भाड्याने घेणारांपैकी एकाचा मृत्यु झाल्यास, त्या लॉकरमधील चीजवस्तू, केवळ विहित केलेल्या रीतीनुसार (नामनिर्देशित जीवित व्यक्ती संयुक्तपणे)त्या वस्तूंची यादी तयार केल्यावर बाहेर काढण्यास परवानगी आहे. अशा बाबतीत, अशी यादी तयार केल्यावर त्या वस्तू बाहेर काढल्यावर, नामनिर्देशित आणि जीवित असलेले भाड्याने घेणारे ह्यांना, त्या बँकेत सर्व वस्तू ठेवावयाच्या असल्यास, लॉकर भाड्याने घेण्यासाठी त्यांना बँकेशी नवा करार करावा लागेल.

५) बँकिंग रेग्युलेशन, १९४९ च्या कलम ४५ झेडई व ५६ अनुसार, नामनिर्देशित असलेल्या अल्पवयीन व्यक्तीला, लॉकरमधील वस्तू घेण्यासाठी अटकाव करता येत नाही. तथापि, अशा बाबतीत बँकांची जबाबदारी म्हणजे, एखाद्या अल्पवयीन नामनिर्देशिताच्या वतीने लॉकरमधील वस्तू काढतेवेळी, त्या अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने स्वीकारण्यास कायद्याने सक्षम असलेल्या व्यक्तीलाच त्या वस्तू दिल्या जातील ह्याची खात्री करुन घेणे.

## ५ खात्यांमधील व्यवहार

### ५.१ संयुक्त खाती

#### ५.१.१ संयुक्त खात्यातील व्यवहारांच्या रीती

इंडियन बँक्स असोशिएशन, मुंबई ह्यांच्या दि २८ ऑगस्ट १९८० चे पत्र क्र. एलए.सी/१९.२६.२९ ची एक प्रत जोडपत्र १ मध्ये दिली आहे. ह्या विषयावरील माहिती व आवश्यक मार्गदर्शन ह्यासाठी बँका त्यांच्या शाखांना योग्य त्या सूचना देण्याचा विचार बँका करु शकतात.

#### ५.१.२ संयुक्त खाती उघडताना घ्यावयाच्या सावधानता

१) संयुक्त खातेधारकांची संख्या जास्त असल्यास, संयुक्त खाती उघडताना व त्यात व्यवहार करु देताना बँकांनी पुढील मार्गदर्शक तत्वे नजरेसमोर ठेवावीतः

अ) एखाद्या संयुक्त खात्यात खातेदारांची संख्या किती असावी ह्यावर निर्बंध नसले तरी, संयुक्त खाते उघडण्याबाबतची प्रत्येक विनंती काळजीपूर्वक तपासून पाहणे हे बँकांचे कर्तव्य व आवश्यक आहे. विशेषतः अशी खाती उघडण्यापूर्वी त्याचा हेतू, त्या पक्षांच्या धंद्याचे स्वरुप, आणि त्याबाबतचे इतर पैलु ह्यांचाही विचार केला गेला पाहिजे. खातेदारांची संख्या जास्त असल्यास काळजी घेतली पाहिजे.

ब) तृतीय पक्षाला देय असलेले अकाउंट पेई चेक्स गोळा केले जाऊ नयेत.

क) “क्रॉस्ड् जनरली” आणि पेयेबल टु “ऑर्डर” असलेले चेक्स, केवळ आदेशितीची सही (एडॉर्समेंट) असल्यासच गोळा केले जावेत.

ड) मोठ्या रकमेचे चेक्स गोळा करतेवेळी सावधानता ठेवली जावी.

ई) संयुक्त खात्यांमध्ये केल्या गेलेल्या व्यवहारांची बँकांद्वारे नियतकालिक छाननी केली जावी व त्याबाबत योग्य वाटेल ती कारवाई केल जावी.

२) संयुक्त खाती उघडणे व त्यामधील व्यवहार/चालविली जाणे ह्याबाबत वरील मुद्दयांनुसार, अंतर्गत यंत्रणा व दक्षता यंत्रणा अधिक घट्ट केली जावी.

### ५.२ नवीन खात्यांमधील व्यवहारांवर देखरेख ठेवणे

५.२.१ नवीन खात्यांमधील व्यवहारांवर बारीक नजर ठेवण्यासाठी एक यंत्रणा सुरु केली जावी. शाखांमध्ये, नवीन खात्यांवर देखरेख ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी, संबंधित विभागांच्या प्रभारी अधिकाऱ्यांची असली तरी, मोठ्या शाखांमधील शाखा प्रबंधक किंवा ठेवी खात्याचे प्रबंधक ह्यांनी, नवीन खाते उघडल्यावर, त्यात फसवाफसवीचे किंवा शंकास्पद व्यवहार केले जाण्याविरुध्द, प्रथम सहा महिने तरी, त्या खात्यांवर नजर ठेवावी. संशयास्पद स्वरुपाचा एखादा व्यवहार झाल्याचे आढळल्यास, बँकांनी त्या खातेदाराजवळ त्या व्यवहाराची चौकशी

करावी आणि त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण न मिळाल्यास त्या व्यवहारांची माहिती सुयोग्य अशा अन्वेषण विभागाला द्यावी.

५.२.२ असे नवीन खाते उघडल्यावर लगेच/अल्प कालावधीत, अशा खात्यात मोठ्या रकमेचे चेक्स/ड्राफ्ट्स गोळा करण्यासाठी भरले गेल्यावर किंवा टेलिग्राफिक ट्रान्स्फर(टीटी)/मेल ट्रान्स्फर(एमटी) ह्यांच्या द्वारे रकमा भरल्या गेल्यास सावधानता ठेवली जावी. अशा बाबतीत, त्या संलेखांचा तसेच खातेदाराचा खरेपणा पूर्णतः पडताळून पाहिला जावा, तशीच जरुर पडल्यास पैसे देण्याऱ्या बँकेने गोळा करणाऱ्या बँकेशी संपर्क साधून, दिलेल्या मोठ्या रकमेच्या चेक्स/ड्राफ्ट्सचा खरेपणा पडताळून पहावा. रसायनिक पध्दतीने फेरफार केला आहे काय हे पाहण्यासाठी, गोळा करण्यासाठी दिलेले मोठ्या रकमेचे चेक्स/डिमांड ड्राफ्ट्स (डीडी) अतिनील दिव्याखाली तपासून पाहिजे जावेत.

**५.३ सर्व खात्यांमधील व्यवहारांवर देखरेख ठेवणे**

५.३.१ मोठ्या रकमेची रोकड काढली जाण्याबाबत जवळून देखरेख करण्याची प्रणाली सुरु करण्यात यावी. नवीनच उघडलेल्या व विद्यमान खात्यात तिसऱ्या पक्षाचे चेक्स/ड्राफ्ट्स भरले जाऊन त्यानंतर मोठ्या रकमा काढल्या जातात, तेव्हा अशा मोठ्या रकमांची निकासी करु देण्याबाबत ग्राहकांनी केलेल्या विनंतीवर बँकांनी करडी नजर ठेवावी.

५.३.२ केवळ जमा खात्याच्या बाबतच नव्हे तर कॅश क्रेडिट/ओव्हरड्राफ्ट्स इत्यादींच्या बाबतही, रु. ५ लाख व त्यापेक्षा अधिक रोखीने रकमा जमा करण्यावर व काढल्या जाण्यावर देखरेख ठेवण्यसाठी बँकांनी एक यंत्रणा सुरु करावी. बँका/शाखा ह्यांनीही, वैय्यक्तिक ५ लाख व त्यावरील रकमा रोखीने जमा किंवा काढल्या जाण्याबाबत नोंद करण्यासाठी एक वेगळे रजिस्टर ठेवावे. अशा नोंदविलेल्या तपशीलामध्ये, जमा करण्याबाबत, खातेदाराचे नाव, खाते क्रमांक, जमा केलेली रक्कम, आणि निकासी करण्याबाबत, खातेदाराचे नाव, खाते क्रमांक, काढलेली रक्कम व त्या चेकच्या लाभार्थीचे नाव ह्यांचा समावेश असावा. ह्याशिवाय, रु ५ लाख व त्यापेक्षा अधिक रोख रकमेच्या जमा किंवा काढल्या जाण्याच्या घटना शाखा प्रबंधकाने, दर पंधरा दिवसांनी, संपूर्ण तपशील देऊन, म्हणजे, खातेदारचे नाव, खाते क्रमांक, खाते उघडल्याची तारीख इत्यादि, मुख्य कार्यालयाला कळवाव्यात. शाखांकडून अशी विवरणपत्रे मिळाल्यावर, मुख्य कार्यालयने त्यातील तपशील ताबडतोब तपासून पहावा आणि तो व्यवहार दर्शनीच संशयास्पद वाटल्यास खास अधिकारी नेमून त्याची सखोल चौकशी करावी. रिझर्व बँकेचे तपासनीस अधिकारी त्यांच्या तपासणीदरम्यान शाखांनी सादर केलेल्या विवरणपत्रांचीही तपासणी करतील.

५.३.३ चेक्सचे प्रदान करतेवेळी सावधानता ठेवण्याचे दुसरी क्षेत्रे म्हणजे, पैसे काढणाऱ्याच्या सहीची पडताळणी, नमुना सह्यांच्या कार्डांचा ताबा, चेकबुक्स दिली जाण्यावर देखरेख आणि कोरी चेकबुक/चेकची पाने ह्यांच्या ताब्यावरील नियंत्रण. मोठ्या रकमेचे चेक्स अतिनील दिव्यांखाली तपासून पाहिले जाण्याच्या गरजेवर सर्व बँकांचे एकमत असले तरी, प्रत्यक्षात मात्र ते क्वचितच केले जाते आणि ह्या बाबतीत थोडी ढिलाई असण्याची प्रकृती अस्ते व त्यामुळे टाळू शकता येईल असा तोटा होतो. ह्याशिवाय, टोकन देणे व ताब्यात ठेवणे, काउंटरवर सादर केलेल्या चेक्सची हालचाल, आणि बँकांनी त्यांचे प्रदान केले गेल्यावर सर्व संलेखांचा ताबा घेणे ह्याबाबतही योग्य ती काळजी घेतली गेली पाहिजे. खाती बंद/हस्तांतरित करण्यापूर्वी न वापरलेली चेकबुके परत करण्यास खातेदार/ग्राहकांना सांगण्यात आले पाहिजे. नमुना सह्यांची

कार्डे सुरक्षिततेने सांभाळली जाणेही अत्यंत महत्वाचे आहे, विशेषतः कार्यकारी सूचनांमध्ये बदल केला गेला असल्यास, त्याबाबत शाखेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने तो पडताळून पाहिला पाहिजे.

## ५.४ चेकबुक्स देणे

ग्राहकाकडून सही केलेली, मागील चेकबुकातील रिक्विझिशन स्लिप दिली गेल्यानंतरच नवीन चेकबुक दिली जावे. एखाद्या रिक्विझिशन पत्रा विरुध्द चेकबुक दिले गेल्यास, आदेशकाला (ड्रॉवर) स्वतः बँकेमध्ये येण्यास सांगितले जावे किंवा संबंधित चेकबुक धारकाबरोबर (बेअरर) पाठविण्याएवजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले जावे खातेदार स्वतः विनंतीपत्र व पासबुक घेऊन स्वतः आल्यासच त्याला सुटे चेक्स दिले जावेत.

## ५.५ बिनहक्काच्या ठेवी आणि अकार्यकारी/सुप्त खाती

वर्षानुवर्ष बँकांमध्ये ठेवलेल्या, हक्क न सांगण्यात आलेल्या ठेवींचा आणि अशा ठेवींबाबतचे धोके ह्याचा विचार करता, असे वाटत आहे की, ज्यांची खाती अकार्यकारी झाली आहेत अशा खातेदारांचा पत्ता शोधण्यासाठी बँकांनी अधिकतर उन्मुख अशी भूमिका घ्यावी. ह्याशिवाय, बँका अशा बिनहक्काच्या ठेवींचा हक्क नसतानाही त्यावर व्याज न देता उपभोग घेत आहेत अशी भावनाही निर्माण झाली आहे. ह्या सर्वांचा विचार करता, अकार्यकारी/सुप्त खाती हाताळताना युसीबींनी खाली दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

१) एक वर्षापेक्षा अधिक काळ ज्यामध्ये कोणताही व्यवहार नसलेल्या (म्हणजे, नियतकालिक व्याज किंवा सेवा आकार सोडून अन्य कोणतेही जमा किंवा वजा व्यवहार नसलेल्या) खात्यांचा नागरी सहकारी बँकांनी वार्षिक आढावा घ्यावा. बँकांनी ग्राहकांशी संपर्क साधून, त्यांच्या खात्यात कोणतेही व्यवहार होत नसल्याबाबतच्या कारणांची शहानिशा करुन घ्यावी. खात्यात व्यवहार नसल्याचे कारण, ग्राहक त्या क्षेत्रातून अन्य ठिकाणी गेला आहे असे असल्यास, त्या ग्राहकांना, विद्यमान खात्यामधील रक्कम त्यांच्या नवीन खात्यात हस्तांतरित करण्यासाठी त्या खात्याची माहिती मागावी.

२) अशी पाठविलेली पत्रे परत आल्यास त्यांनी ताबडतोब, त्या ग्राहकांचा किंवा तो मृत झाला असल्यास त्यांच्या कायदेशीर वारसाचा ठावठिकाणा शोधण्यासाठी चौकशी सुरु करावी.

३) ग्राहकाचा ठावठिकाणा लागत नसल्यास, त्या खातेदाराची ओळख करुन देणाऱ्या व्यक्तींशी संपर्क साधण्याचा विचार बँकांनी करावा. त्यांच्याजवळ असलेल्या माहितीनुसार, त्या ग्राहकाला नोकरी देणारा/अन्य व्यक्ती ह्यांच्याशी संपर्क साधावा. बँकेजवळ त्या ग्राहकाचा टेलिफोन/सेलनंबर दिलेला असल्यास, त्यावरही संपर्क साधावा. अनिवासी खात्यांबाबत, बँकांनी, ई-मेलद्वारे त्या खातेदारांशी संपर्क साधून, त्या खात्याच्या माहितीबाबत दुजोरा घ्यावा.

४) दोन वर्षांपेक्षा अधिक कालपर्यंत खात्यात कोणताही व्यवहार झालेला नसल्यास ते बचत तसेच चालु खाते अकार्यकारी/सुप्त खाते समजले जावे.

५) ते खाते चालु न ठेवण्याबाबत खातेदाराकडून उत्तर आल्यास, बँकेने ते खाते एक वर्षासाठी कार्यकारी खाते म्हणन चालु ठेवणे व त्या काळावधीत त्या खात्यात व्यवहार करण्याची विनंती ग्राहकाला करावी. तथापि ह्या विस्तरित काळातही खातेदाराने त्या खात्यात व्यवहार न

केल्यास, तो विस्तारित काल संपल्यानंतर, बँकांनी त्या खात्याचे वर्गीकरण अकार्यकारी खाते असे करावे.

६) एखाद्या खात्याचे “अकार्यकारी” असे वर्गीकरण करण्यासाठी, ग्राहकाकडून तसेच तृतीय पक्षाकडून केलेले जमा तसेच वजा व्यवहार विचारात घेतले जावेत, तथापि, बँकेने वजा केलेला सेवा-आकार किंवा जमा केलेले व्याज विचारात घेतले जाऊ नये.

७) ह्याशिवाय, अशी अकार्यकारी खाती वेगळी काढण्याचा उद्देश, फसवाफसवीचे धोके करणे हाच आहे. तथापि एखादे खाते आकार्यकारी ठरविल्यात आल्यामुळे त्या ग्राहकाला अडचण होऊ नये. असे वर्गीकरण हे, त्या खात्याबाबतची जोखमी, ते खाते हाताळण्याऱ्या कर्मचाऱ्याच्या नजरेस आणून देण्यासाठीच आहे. फसवणुक टाळण्यासाठी आणि संशयास्पद व्यवहार रिपोर्ट केला जाण्याच्या दृष्टिकोनातून ह्या व्यवहारावर वरिष्ठ स्तराची देखरेख असावी. तथापि ही सर्व प्रक्रिया ग्राहकाच्या नकळत केली जावी.

८) ग्राहकाचे जोखमी - वर्गीकरण लक्षात घेऊन व त्याबाबत योग्य परिश्रम घेतेल्यानंतर अशा खात्यामधील व्यवहार पुढे सुरु करण्यास परवानगी द्यावी. परिश्रम महणजे, त्या व्यवहाराचा खरेपणा, सही व ओळख ह्यांची पडताळणी इत्यादि तथापि, बँकेने अशी अधिकतर दक्षता ठेवल्याच्या कारणामुळे ग्राहकाला अडचण येणार नाही ह्याची खात्री करुन घ्यावी

९) अकार्यकारी खाते पुनः सुरु केल्याबाबत कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

१०) बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी अकार्यकारी खाते पुस्तकात असलेल्या रकमांची बँकेच्या अंतर्गत तपासनीस/वैधानिक तपासनीस ह्यांच्याद्वारे योग्य प्रकारे लेखातपासणी केली जाईल ह्याची खात्री करुन घ्यावी.

११) एखादे खाते अकार्यकारी असो किंवा नसो, बचत खात्यावरील व्याज त्या खात्यामध्ये नियतकालिक धर्तीवर जमा केले जावे. एखादी स्थिर ठेवीची पावती परिपक्व झाली व त्याबाबतची रक्कम अदा केली गेली नाही तरी, बँकेकडील हक्क न सांगितलेल्या रकमेवर बचत खात्याचा व्याजदर लागु होईल.

## ५.६ मोठ्या रकमांच्या व्यवहारांसाठी इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा वापर

प्रदान प्रणालींची सुरक्षितता व सुरक्षा ह्यांचे महत्व ओळखून, भारतीय रिझर्व बँकेने इलेक्ट्रॉनिक पध्दतीचे तीन प्रकार सुरु केले आहेत, म्हणजे रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट सिस्टिम (आरटीजीएस), नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्स्फर (एनईएफटी) प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक क्लियरिंग सर्व्हिस (ईसीएस), गेल्या काही वर्षात ह्या पध्दतीतून प्रदान केले जाण्यात वाढ होत आहे.
आरबीआयने स्थापन केलेल्या अंतर्गत कार्यकारी गटाने, कागद आधारित प्रणालीतून इलेक्ट्रॉनिक पध्दतीत जाण्याबाबतचे निरनिराळे प्रश्न तपासून पाहिले आहेत आणि त्यानुसार, प्रोत्साहन देणे, देखरेख ठेवणे व अत्यावश्यक करणे ह्यासाठी टप्प्या टप्प्याने करावयाच्या कार्यक्रमाची शिफारस केली आहे. ह्या गटाच्या शिफारशींवर आधारित, आरबीआयच्या वेबसाईटवर एक पत्रिका ठेवण्यात आली व रु १ कोटी व त्यावरील रकमांचे व्यवहार, आरबीआय नियंत्रित संस्थांमध्ये इलेक्ट्रॉनिक पध्दतीने अत्यावश्यक करण्याच्या गरजेबाबत

जनतेकडून मते मागविली होती. त्याबाबत मिळालेल्या मतांची तपासणी केली गेली, हा प्रस्ताव सर्वसाधारतः स्वीकार्य असल्याचे दिसल्याने असे ठरविण्यात आले की, रु १ कोटी व त्यावरील मोठ्या रकमेचे व्यवहार इलेक्ट्रॉनिक प्रदान यंत्रणेद्वारा आणि खाली दिलेल्या कालावधीत केले जाणे अपरिहार्य (मँडेटरी) केले जावेतः-

| व्यवहाराच्या प्रकार | कालावधी |
|---|---|
| १) आरबीआय नियंत्रित संस्थांमधील, (म्हणजे बँका, प्राथमिक डीलर्स, एनबीएफसी,) रु १ कोटी व त्यावरील रकमेच्या प्रदानाण्चे सर्व व्यवहार. | १ एप्रिल २००८ |
| २) आरबीआय नियंत्रित बाजारांमधील, (म्हणजे नाणेबाजार, सरकारी सिक्युरिटीज् व विदेशी मुद्रा बाजार,) रु १ कोटी व त्यावरील रकमेच्या प्रदानांचे सर्व व्यवहार | १ एप्रिल २००८ |

इलेक्ट्रॉनिक प्रदान प्रणाली व त्यांचा उपयोग करणारांना मिळालेली स्वस्थता विचारात घेता, अपरिहार्य ठरविलेली व १ कोटीची मर्यादा, ऑगस्ट १, २००८ पासून रु १० लाख करण्याचे ठरविण्यात आले आहे.

**५.७ वृध्द/आजारी/अपंग ग्राहकांद्वारे बक खात्याचे व्यवहार**

५.७.१ बँकेच्या वृध्द/आजारी/अपंग असलेल्या ग्राहकांना त्यांची बँकखाती चालविण्यास मदत व्हावी ह्यासाठी, खाली दिलेल्या परिच्छेद ५.६.२ मध्ये दिलेल्या कार्यरीतींचा अवलंब केला जावा. आजारी/वृध्द/अपंग खातेदारांच्या बाबी पुढील वर्गात मोडतातः

१) चेकवर सही न करु शकता येंणारा खात्यातून पैसे काढण्यासाठी बँकेत प्रत्यक्ष येऊ न शकणारा पण चेकवर/पैसे काढायच्या फॉर्मवर त्याचा/तिचा अंगठ्याचा ठसा उमटवू शकतो असा खातेदार.

२) बँकेत प्रत्यक्ष येऊ न शकणाराच नव्हे तर, शारिरिक दोष/अकार्यक्षमता ह्यामुळे, चेक/विथड्रॉल फॉर्मवर अंगठ्याचा ठसा उमटवू न शकणारा खातेदार.

५.७.२ बंका पुढील कार्यरीती अवलंबू शकतातः-

१) आजारी/वृध्द/अपंग खातेदाराच्या अंगठा पायाचे बोट ह्याचा ठसा मिळाल्यावर, त्यांची ओळख, बँकेला माहित असलेल्या अशा दोन स्वतंत्र साक्षीदारांनी दिली पाहिजे व त्यापैकी एक बँकेचा जाबाबदार अधिकारी असला पाहिजे.

२) ग्राहक त्याच्या/तिच्या अंगठ्याचा ठसा उमटवू शकत नसेल तसेच बँकेत प्रत्यक्ष येऊही शकत नसल्यास, त्या चेक/विथड्रॉल फॉर्मवर खातेदाराने केलेली खूण, दोन स्वतंत्र साक्षीदारांनी ओळखली पाहिजे व त्यापैकी एक त्या बँकेचा जबाबदार अधिकारी असला पाहिजे.

५.७.३ अशा बाबतीत, वरील प्रमाणे मिळालेल्या चेक/विथड्रॉल फॉर्मच्या आधारावर कोण पैसे काढणार ह्याबाबत बँकेला कळविण्यासाठी ग्राहकाला सांगितले जावे, व त्या व्यक्तीची ओळाख

दोन स्वतंत्र साक्षीदारांद्वारे पटविली जावी.बँकेमधून प्रत्यक्ष रक्कम काढणाऱ्या व्यक्तीला त्याची सही बँकेकडे देण्यात सांगितले जावे.

५.७.४ ह्या संदर्भात, दोन्हीही हात गमावलेल्या व चेक/ /विथड्रॉल फॉर्म ह्यावर सही करण्यास असमर्थ असलेल्या व्यक्तीने बँक खाते उघडण्याबाबत इंडियन बँक्स असोशिएशनने त्यांच्या सल्लागाराकडून मिळविलेल्या मतानुसार, सही करणारी व्यक्ती व त्या फॉर्मवर सही किंवा खूण करणारी व्यक्ती ह्यांच्यामध्ये प्रत्यक्ष/शारिरिक संपर्क स्पर्श असणे आवश्यक आहे.ह्यासाठी, दोन्हीही हात गमावलेल्या व्यक्तीबाबत, एखाद्या खुणेद्वारेच सही असू शकते.ही खूण ती व्यक्ती कोणत्याही प्रकारे करु शकते. ती खूण म्हणजे पायाच्या बोटाचा ठसाही असू शकतो, ज्याला सही करावयाची आहे अशा व्यक्तीच्या वतीने कोणीही केलेल्या खुणेनुसार हे केले जाऊ शकते आणि ती खूण, सही करणाऱ्या व्यक्तीशी शारिरिक/प्रत्यक्ष संपर्क-स्पर्श करणाऱ्या व्यक्तीद्वारे केलेली असेल.

५.७.५ आत्मकेंद्रीपणा, लकवा, मेंदू क्षीणता व बहुविध अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी असलेल्या राष्ट्रीय ट्रस्टद्वारा (तो ट्रस्ट) आरबीआयला सांगण्यात आले आहे की, ऑटिझम, सेरेब्रल पॅल्सी, मेंटल रिटार्डेशन व मल्टिपल डिसएबिलिटीज असलेल्या व्यक्तींसाठी असलेला अधिनियम, १९९९ साठी असलेल्या वरील राष्ट्रीय ट्रस्टखाली स्थापन झालेल्या स्थानिक स्तरीय समितींनी, अपंगत्व असलेल्या व्यक्तींबाबत दिलेल्या पालकत्व प्रमाणपत्रांचा स्वीकार बँकांनी व बँक क्षेत्राने करावा किंवा नाही, ह्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. ह्या ट्रस्टने सांगितले आहे की, वरील अधिनियमाखालील अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी कायदेशीर पालक नेमण्यासाठी संसदेने हा खास अधिनियम पारित केला होता. ह्या अधिनियमात, ह्या अधिनियमाखाली स्थापन झालेल्या स्थानिक स्तरीय समिती, अशी अपंगत्वे असलेल्या व्यक्तींसाठी, कायदेशीर पालक नेमण्याची तरतुद आहे. ह्या ट्रस्टने मत दिले आहे की, असा एखादा नेमलेला कायदेशीर पालक, तो कायदेशीर पालक असेपर्यंत, बँकखाते उघडू व चालवू शकतो. येथे नोंद घ्यावी की, मानसिक स्वास्थ्य अधिनियम, १९८७ च्या तरतुदींनुसार, जिल्हा न्यायालयांद्वारे कायदेशीर पालक नेमले जाऊ शकतात. **ह्यासाठी बँकांना सांगण्यात येत आहे की, बँकखाती उघडण्या/चालविण्यासाठी, त्या, मानसिक स्वास्थ्य अधिनियमाखाली जिल्हा न्यायालयाने दिलेल्या किंवा वरील अधिनियमाखालील स्थानिक स्तरीय समित्यांनी दिलेल्या पालकत्व प्रमाणपत्रावर विसबूंन रहावेः** बँकांनी ह्याचीही खात्री करुन ध्यावी की, अपंग व्यर्क्तीचे आईवडील/नातेवाईक ह्यांना अडचण येऊ नये ह्यासाठी, त्यांच्या शाखांना योग्य ते मार्गदर्शन दिले जाईल.

**५.८ फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ खाली, भारतातील निरनिराळे सहयोगी गट/संस्था ह्यांच्याद्वारे विदेशी सहाय्याचा स्वीकार.**

५.८.१ फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम अनुसार, निश्चित असा सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रम असलेल्या व विदेशी सहाय्य मिळविणारे गट/संघ/संस्था ह्यांनी, भारत सरकारच्या गृहमंत्रालयाकडे नोंदणी करुन घ्यावी आणि गृहमंत्रालयाकडे नोंदणी करतेवेळी केलेल्या अर्जात त्यांनी निर्देशिलेल्या बँकेच्या शाखांमधूनच ते सहाय्य मिळवावे.

५.८.२ ह्याशिवाय, ह्या अधिनियमात उल्लेखिलेल्या कलम (६) च्या उपकलम (१) अनुसार, असा प्रत्येक संघ/गट केंद्रीय सरकारकडे नोंदणीकृत झालेला नसल्यास, त्याने कोणतेही विदेशी सहाय्य, भारत सरकारची पूर्ण परवानगी घेऊनच मिळवावे.

५.८.३ राजकीय पक्ष नसलेल्या परंतु राजकीय स्वरुपाच्या काही संघटना, (त्यांच्या शाखा/एकके ह्यासह), भारत सरकारने, ह्या अधिनियमाच्या कलम ५(१) अनुसार नेमकेपणाने दर्शविलेल्या आहेत. ह्या संघटनांनाही विदेशी सहाय्य घेण्यासाठी केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. ह्याबाबत बँकांनी पुढील दक्षता घ्याव्यातः-

१) तो संघ/गट भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडे नोंदणीकृत असल्यासच विदेशी सहाय्याच्या चेक्स/ड्राफ्ट्सच्या रकमा जमा कराव्यात.
२) तो संघ/गट फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ खाली, गृहमंत्रालयाकडे नोंदणीकृत नसल्यास, विदेशी सहाय्याची विशिष्ट रक्कम जमा करण्यासाठी, केंद्र सरकारची पूर्व परवानगी असल्याबाबतच्या गृहमंत्रालयाच्या पत्राचा आग्रह धरावा.

३) फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ खाली, असा संघ/गट विदेशी सहाय्य मिळविण्यासाठी, गृहमंत्रालयाकडे वेगळा पंजीकृत झाला नसल्यास त्यांच्या खात्यात जमा केली जाऊ नये.

४) विदेशी सहाय्य मिळविण्याबाबत केंद्र सरकारची पूर्व परवानगी न घेतलेल्या संघ/गटांच्या खात्यात ती जमा केली जाऊ नये.

५) राजकीय पक्ष नसलेल्या, राजकीय स्वरुपाच्या संस्थांचे (त्यांच्या शाखा व एकके ह्यासह) चेक्स/डिमांड ड्राफ्ट्स इत्यादी, फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ खाली त्यांनी केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय जमा केले जाऊ नयेत.

६) अशा संस्थांना विनाकारण त्रास दिला जाणार नाही ह्याची खात्री करुन घेण्यासाठी, अशा संस्थांना गृहमंत्रालयाने देलेले नोंदणी क्रमांक, संबंधित अभिलेखांमध्ये, व विशेषतः त्या संस्थांच्या विदेशी मदत खात्याच्या रजिस्टर मधील त्या-त्या पृष्ठांवर नोंद करुन ठेवण्यात यावेत.

७) बँकेकडे, रोखीकरण करण्यासाठी एखादा चेक/डीडी एखाद्या संघाने/गटाने किंवा पंजीकरण न झालेल्या किंवा पूर्व परवानगी आवश्यक असलेल्या संघ/गटाने सादर केल्यास, त्या बँकेच्या संबंधित शाखेने पुढील सूचनांसाठी गृहमंत्रालयाशी संपर्क साधावा. विदेशी मदत मिळविण्याबाबत केंद्र सरकारची परवानगी असल्याबाबत गृहमंत्रालयाचे पत्र जोपर्यंत तो संघ/संस्था सादर करत नाही, तोपर्यंत, राजकीय पक्ष नसलेल्या, पण केंद्र सरकारने राजकीय स्वरुपाची म्हणून घोषित केलेल्या व नोंदणीकृत नसलेल्या संघ/संस्थांच्या खात्यात बँकांना जमा दाखवू नये.

८) जेथे पूर्व परवानगी देण्यात आली आहे तेथे, अशी परवानगी, संबंधित पत्रात नेमकेपणाने निर्देश केलेली विदेशी मदत स्वीकारण्याबाबतच असते. गृहमंत्रालय, प्रत्येक संघ/संस्था ह्याबाबतच्या पंजीकरणाचा आदेश किंवा दिलेली पूर्व परवानगी ह्याबाबतच्या पत्राची एक प्रत, त्या संस्था/संघ ह्यांनी विदेशी मदतीसाठी, ठेवलेले खाते ज्या बँकशाखेत ठेवलेले आहे त्या बँकशाखेला पाठवीत असते.

५.८.४ वरील हेतूसाठी, ह्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल ह्याची खात्री करण्यासाठी बँकेमध्येच सुयोग्य अशा प्रणाली योजिल्या जाव्यात व त्यांचे पालन न करण्याबाबतचे प्रसंग

संपविण्यात यावेत. अशी प्रणाली, काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्व शाखांना कळविली जावी आणि त्यावर मुख्य कार्यालयाने कार्यक्षम देखरेख ठेवावी.

५.८.५ ह्याशिवाय, सहामाही धर्तीवर, ती सहामाही संपल्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीत, दर वर्षी ३० सप्टेंबर व ३१ मार्च अखेरच्या काळासाठी, जोडपत्र २ मधील नमुन्यानुसार, अशा संस्था/संघ ह्यांच्या खात्यात जमा झालेल्या विदेशी सहाय्याचा अहवाल, भारत सरकारच्या गृहमंत्रालयाकडे सादर करणे बँकांसाठी आवश्यक आहे. असा सहामाही अहवाल सरकारकडे पाठविण्यास मदत होण्यासाठी, बँका त्यांच्या मुख्य कार्यालयात एखादा "नोडल ऑफिसर" नेमू शकतात आणि असे अहवाल बिनचुक व योग्य वेळी सादर करण्याबाबत तो जबाबदार असेल.

५.८.६ ह्या निदेशांचे अनुपालन न करणे हे ह्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन समजले जाईल. विहित अहवाल सरकारकडे ठरलेल्या वेळी सादर न केला गेल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल.

**६ मृत ठेवीदारांबाबतच्या दाव्यांची तडजोड**

ठेवीदाराचा मृत्यु झाल्यावर त्याबाबतच्या दाव्यांची शीघ्र व विनात्रास तडजोड होण्यासाठी पुढील मार्गदर्शक तत्वांचे पालन केले जावे.

**ठेवी खात्यातील शिल्लक मिळविणे**

**६.१ जीवितव्यक्ती/नामनिर्देशक कलम असलेली खाती**

ठेवीदाराने नामनिर्देशन सुविधा वापरुन जेथे वैध नामनिर्देशन केले आहे किंवा जेथे जीवित व्यक्ती कलम ("दोन्ही पैकी एक किंवा जीवित व्यक्ती" किंवा "कोणीहि एक किंवा जीवित व्यक्ती" कलम किंवा "दुसरा किंवा जीवित व्यक्ती") कलम घालून खाते उघडले गेले असेल, तेथे, त्या ठेवीखात्यामधील शिल्लक रक्कम, मृत ठेवीदाराच्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशिताला दिली जाणे हे बँकेने जबाबदारी पूर्ण करणेच होय. मात्र त्यासाठीः-

अ) बँकेने त्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांच्या ओळखी पटविण्यात योग्य ती काळजी व दक्षता घेतली असावी व सुयोग्य अशा कागदोपत्री पुराव्यातून ठेवीदाराच्या मृत्युबाबत खात्री करुन घेतली असावी.

ब) मृत ठेवीदाराच्या खात्यामधून प्रदान करण्याबाबत, कोणत्याही सक्षम कोर्टाचा बँकेवर मनाई हुकुम नसावा.

क) जीवित व्यक्ती/नामनिर्देशित ह्यांना स्पष्ट करण्यात आले आहे की, मृत ठेवीदारांच्या कायदेशीर वारसांचे ट्रस्टी म्हणून बँकेकडून हे प्रदान करण्यात आले आहे. म्हणजे, केलेल्या अशा प्रदानामुळे, ज्यांना प्रदान करण्यात आले आहे त्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांविरुध्द कोणत्याही व्यक्तीने केलेला दावा किंवा हक्क ह्यांना बाधा येणार नाही.

**६.२** येथे नोंद घेतली जावी की, आधी दिलेल्या अटींनुसार, जीवित व्यक्ती/नामनिर्देशिताला बँकेकडून प्रदान केले जाणे हे बँकेने आपली जबाबदारी पूर्ण केल्याचे समझले जाईल. कायदेशीर प्रतिनिधित्वाचा आग्रह धरला जाणे हे अनावश्यक असून ते जीवित व्यक्ती/

नामनिर्देशितांना टाळता येण्याजोगी असुविधा निर्माण करण्यासारखेच आहे व त्यामुळे गंभीर स्वरुपाची पर्यवेक्षकीय नाराजीच निर्माण होईल. अशा बाबतीत, मृत ठेवीदाराच्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांना प्रदान करतेवेळी, बँकांनी वारसा प्रमाणपत्र, लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन किंवा प्रोबेट इत्यादींसाठी किंवा जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांकडून इंडेमिंटी बाँड किंवा हमी ह्यांचा आग्रह धरणे टाळावे. मग त्या खातेदाराच्या नावे **कितीही रक्कम जमा असो.**

## ६.३ जीवित व्यक्ती/ नामनिर्देशित कलम नसलेली खाती

जेथे मृत ठेवीदाराने कोणतेही नामनिर्देशन केले नसेल किंवा "कोणाही एक किंवा जीवित व्यक्ती" म्हणून असलेली खाती सोडून (एकमेव किंवा संयुक्त खाते) अन्य खात्यांच्या बाबत, बँकांना सांगण्यात येते की त्यांनी, सर्वसामान्य माणसाला होणाऱ्या असुविधा व अनावश्यक त्रास टाळण्याची गरज लक्षात घेऊन, त्या ठेवीदाराच्या कायदेशीर वारसांना पुनर्प्रदान करण्यासाठी सुलभीकृत कार्यरीत अनुसरावी. ह्या संदर्भात, बँकांनी त्यांच्या जोखीम व्यवस्थापन प्रणाली लक्षात घेऊन, मृत ठेवीदारांबाबतच्या हक्कांची तडजोड, इंडेमिंटी लेटर सोडल्यास अन्य कोणतेही कागदपत्र दिल्यावाचून, मृत ठेवीदारांबाबतच्या दाव्यांच्या तडजोडी करण्यासाठी, त्या ठेवीदारांच्या खात्यामधील शिल्लकेबाबत एक मर्यादा ठरवावी.

## ६.४ मुदत ठेवीखात्यांची मुदतपूर्व समाप्ति

मुदत ठेवींच्या बाबतीत, बँकांनी त्यांच्या खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये कलम घालावे की त्या ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, मुदत ठेवींची मुदत पूर्ण भरण्यापूर्वीच समाप्ति करण्यास परवानगी दिली जाईल. त्याच खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये अशी मुदतपूर्व निकासींवर दंडात्मक आकार लावण्यात येणार नाही.

## ६.५ मृत ठेवीदाराच्या नावे आलेल्या रकमांची हाताळणी

एखाद्या ठेवीखात्याच्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांना होणारा त्रास टाळण्यासाठी, बँकांनी मृत ठेवीदाराच्या नावे/पाईपलाईनमध्ये येणाऱ्या/असलेल्या रकमा हाताळण्याबाबत, त्याच्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांकडून योग्य असा करार/प्राधिकारपत्र घ्यावे. ह्याबाबत बँका पुढीलपैकी कोणताही नमुना स्वीकारु शकतातः-

- मृत ठेवीदाराच्या जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांकडून बँकांना "मृत श्री ------------------------ ह्यांची मालमत्ता" ह्या नावे एक खाते उघडण्याबाबत अधिकारपत्र घेता येईल. व ह्या खात्यात कोणत्याही निकासीसाठी परवानगी न देता त्या मृत ठेवीदाराच्या नावे येणाऱ्या पाईपलाईनमधील रकमा जमा करता येतील.

किंवा

- जीवितव्यक्ती/नामनिर्देशित ह्यांच्याकडून, अशा पाईपलाईन मधील रकमा, त्यांच्या प्रेषकांनी, "खातेधारक मृत झाला आहे" अशा शेऱ्याने परत पाठविण्यासाठी बँकांना अधिकारपत्र घेता येईल. त्यानंतर जीवित व्यक्तीला/नामनिर्देशक/कायदेशीर वारस, त्या प्रेषकाला, त्या रकमा पराक्रम्य संलेखाद्वारे किंवा ईसीएसद्वारे सुयोग्य अशा लाभार्थीला प्रदान करण्यास सांगू शकतील.

## ६.६ सेफ डिपॉझिट लॉकर्स/सेफ कस्टडी आर्टिकल्स पर्यंत पोहोचणे

लॉकर भाड्याने घेण्याऱ्या/सेफ कस्टडी आर्टिकल्सच्या मृत ठेवीदारांच्या नामनिर्देशितांकडून (जेथे असे नामनिर्देशन केले असल्यास) किंवा मृत व्यक्तींच्या जीवित व्यक्तींकडून (जीवित व्यक्ती कलमानुसार जेथे लॉकर सेफ कस्टडी वस्तूंपर्यंत, प्रवेश मिळू शकत होता) त्या लॉकर/सेफ कस्टडीमधील वस्तूंपर्यंत, त्यांचे ठेवीदार मृत झाल्यानंतर प्रवेश मिळू देण्याबाबतच्या विनंती हाताळण्यासाठी, बँकांनी, आवश्यक त्या बदलांसह, सर्वसाधारणतः, ठेवी खात्यांबाबत ठेवलेला दृष्टिकोन स्वीकारावा. तथापि ह्याबाबतची सविस्तर मार्गदर्शक तत्वे वेगळ्याने दिली आहेत.

## ६.७ दाव्यांच्या तडजोडीसाठी कालमर्यादा

बँकाना सांगण्यात येत आहे की, मृत ठेवीदारांबाबतच्या दाव्यांची तडजोड आणि जीवित व्यक्ती/नामनिर्देशितांना करावयाचे प्रदान हे, त्यांनी असा दावा मिळल्यापासून १५ दिवसांच्या आत करावे. मात्र, त्यात ठेवीदाराचा मृत्यु झाल्याचा पुरावा व हक्कदारांची सुयोग्य ओळख ह्याबाबत बँकेचे समाधान झाले असावे. बँकांनी योग्य अशा नियतकालिकतेने, मंडळाच्या ग्राहक सेवा समितीला, सातत्याने, मृत ठेवीदार/लॉकर भाड्याने घेणारे/सेफ कस्टडीबाबतचे ठेवीदार ह्याबाबतचे आलेले हक्क/दावे असेच दिलेल्या मुदतीबाहेर प्रलंबित दावे त्यासाठीच्या कारणांसहित कळवावेत.

## ६.८ बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या तरतुदी

ह्या संदर्भात, बकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ४५ झेडए ते ४५ झेडएफ व कलम ५६ कडे तसेच सहकारी बँका (नामनिर्देशन) नियम १९८६ कडे लक्ष वेधण्यात येत आहे.

## ६.९ ग्राहक मार्गदर्शन व प्रसिध्दी

नामनिर्देशन सुविधा व जीवित व्यक्ती कलम ह्यांच्या फायद्याबाबत बँकांनी भरपुर प्रसिध्दी द्यावी व ठेवीखातेदारांनाही मार्गदर्शन करावे. प्रसिध्दीच्या साहित्यामध्ये हे उदाहरणांसहित ठळकपणे सांगितले जावे की, संयुक्त ठेवीदारांपैकी एकाचा मृत्यु झाल्यास, जीवित व्यक्ती कलम असल्या शिवाय, ठेवीच्या रकमेचा हक्क त्या संयुक्त खात्याच्या जीवित खातेदाराकडे आपोआप येत नाही.

## ७ हरविलेला व्यक्तींबाबत दाव्यांची तडजोड

हरविलेल्या व्यक्तींचे नामनिर्देशित/ कायदेशीर वारस ह्यांचेकडून दाता/हक्क स्थापन केला गेल्यास बँकांनी अनुसरण्याची कार्यरीत पुढीलप्रमाणे आहेः-

अ) हरविलेल्या व्यक्तींबाबतचे दावे, इंडियन एव्हिडन्स अधिनियम, १८७२ च्या कलम १०७/१०८ अन्यवे नियंत्रित आहेत. कलम १०७ ती व्यक्ती जीवित असल्याचे (सातत्य) समजते तर कलम १०८ ती मृत झाल्याचे धरुन चालते. इंडियन एव्हिडन्स अधिनियमाच्या कलम १०८ च्या तरतुदीनुसार, तो/ती हरविल्याचा रिर्पोट दिल्याच्या तारखेपासून सात वर्षे उलटल्यानंतरच त्याचा/तिचा मृत्यु झाल्याचे समजण्यात येऊ शकते. त्यामुळे, नामनिर्देशित/कायदेशीर वारस ह्यांना त्या वर्गणीदाराच्या मृत्युबाबतची स्पष्ट धारणा, इंडियन एव्हिडन्स अधिनियमाच्या कलम १०७/१०८ खाली एखाद्या सक्षम कोर्टासमोरच दाखल करावी लागते. तो/ती मृत झाल्याचे

कोर्टाचे मत झाल्यास, त्याच्या आधारावर, हरविलेल्या व्यक्तीबाबतच्या दाव्याची तडजोड केली जाऊ शकते.

ब) बँकांना सांगण्यात येते की त्यांनी असे धोरण तयार करावे की ज्यामुळे, कायदेशीर मत व प्रत्येक प्रकरणांची सत्यता व परिस्थिती लक्षात घेऊन, हरविलेल्या व्यक्तीबाबतच्या दाव्याची तडजोड करता येईल. ह्याशिवाय, सामान्य माणसाला असुविधा व त्रास होऊ न देण्याची गरज लक्षात घेता, बँकांना सांगण्यात येते की, त्यांची जोखमी व्यवस्थापन प्रणाली लक्षात घेऊन,

१) एफआयआर आणि पोलिसांनी दिलेला "सापडत नसल्याचा" अहवाल आणि

२) इंडेमनिटि पत्र हें दोन कागदपत्र वगळता अन्य कोणत्याही कागदपत्रांचा आग्रह न धरता, हरविलेल्या व्यक्तींच्या दाव्यांची तडजोड करता येईल अशी एक मर्यादा निश्चित करावी.

## ८ ठेवींसाठी प्रसारकार्य

### ८.१ ठेवी गोळा करणारे एजंट्स

८.१.१ कोणतीही व्यक्ती, कंपनी, संस्था, संघ किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही स्वरुपात, ठेवींवर दलाली देण्यास बँकांना मनाई आहे.

८.१.२ बँकांनी अनिवासी ठेवींसह, ठेवी गोळा करण्यासाठी, किंवा, आरबीआयने दिलेल्या इंटरेस्ट रेट डायरेक्टिवज्मध्ये असलेल्या परवानगीप्राप्त रीतीने सोडल्यास अन्य रितीने, कोणत्याही प्रकारचे शुल्क/दलालीवर इतर ठेवीसंबंधीचे उत्पाद विकण्यासाठी, संस्था/कंपन्यांमधूनही बाहेरील व्यक्तींना कामावर ठेवू नये.

### ८.२ इनकॉर्पोरेट न झालेल्या संस्था/प्रायव्हेट लि. कंपन्यांद्वारे, "बँक गॅरंटी" सह ठेवींचा स्वीकार

खाजगी वित्तपुरवठा करणारे किंवा इनकॉर्पोरेट न झालेल्या संस्था त्यांच्या मार्फत, कोणत्याही व्यवस्थेखाली बँकांनी ठेवी स्वीकारु नयेत. ह्यामुळे, त्या खाजगी वित्तपुरवठेदाराच्या ग्राहकांच्या लाभार्थ ठेवपावत्या द्याव्या लागतात किंवा मुखत्यारनामा किंवा नामनिर्देशनाने, परिपक्व झाल्यावर ठेवी परत मिळणाऱ्या अशा ग्राहकांना अधिकार मिळतो.

### ८.३ खाजगी संस्थांनी उभारलेल्या ठेवी गोळा करण्याच्या योजना

येथे नोंद घेण्यात यावी की, प्राईज चिट्स अँड मनी सर्क्युलेशन स्कीम्स् (बॅनिंग) अधिनियम, १९७८ (१९७८ चा ४३) अनुसार, संबंधित राज्य सरकारांनी त्याबाबत अधिसूचित केलेल्या, धर्मादाय व शैक्षणिक संस्था सोडल्यास, प्राईज चिट योजना प्रायोजित करणे व चालविणे ह्यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. वरील अधिनियमाखाली, सोडत (लॉटरी) ही "प्राईज चिट" ह्या संज्ञेखाली येते. ह्याशिवाय, बँकेच्या काउंटरवरच लॉटरी तिकिटांची विक्री करणे म्हणजे जनतेची टीका ओढवून घेणेच असल्याने टाळता येण्यासारखे आहे. ह्यासाठी, कोणत्याही प्रकारच्या संस्थांच्या लॉटरी तिकिटांशी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे, बँकांनी आपला संबंध ठेवू नये.

## ९ इतर मुद्दे

### ९.१ बँकिंग प्रणाली व आयकर प्राधिकरणे ह्यादरम्यान अधिक समन्वय

९.१.१ सेफ डिपॉझिट लॉकर्स

आयकर अधिकाऱ्यांना लॉकर्सच्या किल्ल्या ओळखण्यासाठी सहाय्य व्हावे ह्यासाठी, बँकांनी लॉकर्सच्या सर्व किल्ल्यांवर एक विशिष्ट ओळख-संकेत कोरावा.त्यावरुन, ते लॉकर्स भाड्याने देणारी बँक व तिची शाखा कळेल.

९.१.२ सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेसच्या अधिकाऱ्यांशी समन्वय

आयकर विभाग व बँकिंग प्रणाली ह्यांच्यामध्ये अधिकतर समन्वय असण्याची गरज आहे. त्यामुळे, गरज भासेल तेव्हा, कर-अधिकाऱ्यांना आवश्यक असलेली मदत/सहकार्य दिले जाईल ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी. ह्याशिवाय, आयकर अधिनियमाखाली दंडनीय असलेल्या गुन्हांबाबत, त्यांचे कर्मचारी कोणत्याही प्रकारे भाग घेणे/ मदत करणे करत असल्याच्या प्रकरणांची गंभीर दखल घ्यावी. अशा बाबतीत, नेहमीच्या फौजदारी कारवाई बरोबरच अशा कर्मचाऱ्यांवर विभागीय कारवाईही केली जावी.

### ९.२ हक्क व सांगितल्या गेलेल्या ठेवींसाठी रजिस्टर

९.२.१ प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या अखेरीस, दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळपर्यंत कोणताही व्यवहार न झालेल्या, भारतामधील ठेवी खात्यांच्या, बिनहक्काच्या खात्यांचा अहवाल, बँकांनी, रिझर्व बँकेला, फॉर्म ८ मध्ये पाठविणे आवश्यक आहे. ह्यात बिनचुकपणा येण्यासाठी व तो वेळेवर पाठविण्यासाठी, प्रत्येक बँकेच्या सर्व शाखांमध्ये, ह्यासाठी एक वेगळे रजिस्टर ठेवले जाणे आवश्यक आहे.

९.२.२ ह्यासाठी, बिनहक्काच्या ठेवींबाबत एक वेगळे रजिस्टर ठेवण्यास बँकांनी त्यांच्या शाखांना सांगावे.

९.२.३ ह्याबाबत शाखांना सांगण्यात यावे की, ३० वर्षेपर्यंत कोणतेही व्यवहार न झालेल्या ठेवी खात्यांच्या नोंदी त्यांनी ह्या रजिस्टरमध्ये कराव्यात.निरनिराळ्या प्रकारच्या ठेवी खात्यांच्या नोंदीसाठी वेगवेगळे पाने ठेवावीत.

९.२.३.१ शाखांनी, संबंधित बिनहक्काच्या ठेवी खात्याच्या पानावर स्पष्टपणे लिहून ठेवण्यात यावे की, त्या खात्यामध्ये कोणताही व्यवहार करण्याची परवानगी देण्यापूर्वी, बिनहक्काच्या ठेवींबाबतच्या रजिस्टरचा संदर्भ घेतला जावा. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्याची मंजुरी घेतल्या शिवाय, अशा खात्यांमध्ये केलेल्या व्यवहारांना परवानगी दिली जाऊ नये ही पूर्वसूचना बँकेला मिळेल.

## १० “तुमचा ग्राहक जाणा” (केवायसी) मार्गदर्शक तत्वे व मनी लॉंडरिंग विरुध्द असलेली मानके

### १०.१ “तुमचा ग्राहक जाणा” (केवायसी) मार्गदर्शक तत्वे

“तुमचा ग्राहक जाणा” (केवायसी) तत्वाचा एक भाग म्हणून, ठेवीदारांच्या ओळखीसंबंधाने रिझर्व बॅंकेने अनेक मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. आणि आर्थिक फसवणुकी टाळण्यासाठी, मनी लॉंडरिंग व संशयास्पद व्यवहार ओळखण्यासाठी आणि मोठ्या रकमांच्या व्यवहारांची छाननी/देखरेख करण्यासाठी, बॅंकांनी योग्य त्या प्रणाली ठेवण्यात असेही बॅंकांना सांगण्यात आले आहे. नवीन ग्राहकांसाठी खाती उघडताना, बॅंकिंग प्रणालीचा गैरवापर करुन फसवणुकी केल्या जाणे टाळण्यासाठी बॅंकांना सावध राहण्याबाबतच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. अॅंटी मनी लॉंडरिंग (एएमएल) मानके व कॉंबटिंग फायनान्सिंग ऑफ टेररिझम (सीएफटी) ह्यावरील फायनान्शियल अॅक्शन टास्क फोर्स (एफएटीएफ) ने केलेल्या शिफारशींच्या संदर्भात “तुमचा ग्राहका जाणा” बाबतची मार्गदर्शक सूत्रांचा पुनः विचार करण्यात आला आहे. नियामक प्राधिकरणाद्वारे, ही मानके, अॅंटी मनी लॉंडरिंग व कॉंबटिंग फायनान्शियल टेररिजम बाबतची धोरणे ठरविण्यास आंतरराष्ट्रीय मानके ठरली आहेत. बॅंकांना सांगण्यात येते की, त्यांनी संचालक मंडळाच्या मंजुरीने, “तुमचा ग्राहका जाणा” आणि अॅंटी मनी लॉंडरिंगबाबत सुयोग्य धोरणे तयार करुन प्रचारात आणावित. कार्यकारी मार्गदर्शक तत्वे तयार करत असताना, बॅंकांनी खात्री करुन घ्यावी की, ग्राहकाकडून मिळविली जाणारी माहिती, त्या कामाला सुसंगत असेल, आगंतुक नसेल व ती ह्याबाबत वेळोवेळी दिल्या गेलेल्या मार्गदर्शक तत्वांना धरुन असेल. ग्राहकाकडून मिळविण्याची अन्य माहिती खाते उघडल्यानंतर व त्याच्या/तिच्या संमतिने मिळवावी.

ग्राहकाची ओळख पटविण्यासाठी विश्वसनीय असे कागदपत्र/माहितीचा प्रकार व स्वरुप ह्याबाबतची **निदर्शक यादी**, डिसेंबर १५, २००४ चा परिपत्रक युबीडी. पीसीबी. सीआयआर. ३०/०९.१६१.००/२००४-०५ च्या जोडपत्र २ मध्ये देण्यात आली आहे. रिझर्व बॅंकेच्या नजरेस आणण्यात आले आहे की, जोडपत्र २, ज्याला स्पष्टपणे निदर्शक यादी असे म्हणण्यात आले होते, त्याला काही बॅंका परिपूर्ण यादी असे समजतात आणि त्यामुळे जनतेच्या एका मोठ्या भागला बॅंकिंग सेवा मिळू शकत नाहीत. ह्यासाठी बॅंकांना सांगण्यात येते की त्यांनी ह्याबाबतच्या विद्यमान सूचनांचे पुनरावलोकन करावे येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, जोडपत्र २ मध्ये निर्देश केलेल्या कायम पत्ता ह्याचा अर्थ, ती व्यक्ती सर्वसाधारणतः जेथे राहते ती जागा. व त्याबाबत तो पत्ता, एखाद्या युटिलिटी बिलावर असलेला पत्ता किंवा ग्राहकाच्या पत्त्याची छाननी करण्यासाठी बॅंकेने स्वीकारलेल्या अन्य कागदपत्रावरील पत्ता ग्राहका धरला जावा. असे दिसून आले आहे की, काही जवळचे नातेवाईक (म्हणजे, पत्नी, मुलगा, मुलगी, आईवडील) जे त्यांच्या पती, वडील/आई, मुलगा, ह्यांच्या जवळ राहतात त्यांना काही बॅंकांमध्ये खाते उघडण्यात अडचणी येतात, कारण पत्यासाठी युटिलिटी बिले त्यांच्या नावे नसतात. येथे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशाबाबतीत, बॅंकांनी भावी ग्राहक ज्यांच्याकडे राहत आहेत, त्या नातेवाईकांचे ओळाखपत्र व त्याच्या नावे येणारे युटिलिटी बिल घ्यावे. तसेच त्याच्याकडून घोषणापत्र घ्यावे की खाते उघडण्यास इच्छुक व्यक्ती (भावी ग्राहक) ही त्याची नातेवाईक असून त्याच्या/तिच्या सोबत राहत आहे. पत्त्याची अधिक पडताळणी करण्यासाठी बॅंका, पोस्टाने आलेले पत्र ह्यासारख्या पूरक पुराव्याचा उपयोग करु शकतात. ह्या विषयावरील शाखांना कार्यकारी सूचना देतेवेळी, बॅंकांनी रिझर्व बॅंकेने दिलेल्या सूचनांचा मूलभूत हेतु लक्षात घ्यावा आणि अन्यथा कमी जोखमीच्या वर्गीकृत व्यक्तींना होणारा त्रास टाळावा.

“तुमचा ग्राहक जाणा” च्या मानकांवरील मार्गदर्शक तत्वांवरील परिच्छेद ५ मधील सूचना आणि डिसेंबर १५, २००४ च्या अँटी मनी लाँडरिंगसाठीचे उपाय ह्यांना विचारात घेता, बँकांना, खात्यांबाबतच्या जोखमी वर्गीकरणाचे नियतकालिक पुनरावलोकन करण्यासाठी एक प्रणाली सुरु करणे व उच्चतर गरज आहे. बँकांना सांगण्यात येते की, जोखमी वर्गीकरणाबाबतचे असे पुनरावलोकन करण्याची नियतकालिक, सहा महिन्यांतून एकदा पेक्षा **कमी नसावी.** खाते उघडल्यावर, ग्राहकाच्या ओळखी संबंधीची माहिती नियतकालिकतेने अद्यावत करण्यासाठी (छायाचित्रासह) बँकांनी एक प्रणाली सुरु करावी. अशा अद्यावतीकरणासाठीची नियतकालिकता, कमी जोखमी वर्गाच्या ग्राहकांसाठी पाच वर्षातून एकदा व उच्च तसेच मध्यम जोखीमवर्गांच्या ग्राहकांसाठी ती दोन वर्षातून एकदा, ह्यापेक्षा कमी नसावी.

**१०.२ आर्थिक दहशतवादाचा सामना**

अ) पीएमएलए नियमांनुसार, संशयास्पद व्यवहारंमध्ये, इतर बाबींबरोबर, दहशतवादासंबंधीच्या कार्यकृतींना वित्तपुरवठा होत असल्याचा वाजवी आधार असल्याचे समजता येईल असे व्यवहार ही समाविष्ट आहेत. ह्यासाठी बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी दहशतवादाशी संबंध असल्याचा संशय येणाऱ्या व्यवहारांवर अधिकतर देखरेख ठेवण्यासाठी व असे व्यवहार चटकन ओळखण्यासाठी आणि फायनान्शियल इंटलिजन्स युनिट-इंडिया (एफआययु-आयएनडी) ह्यांना त्याबाबत प्राधान्याने कळविण्यासाठी, योग्य ते धोरण ठरवून त्याबाबत सुयोग्य यंत्रणा तयार करावी.

ब) युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिल रिझोल्युशन्स (युएनएससीआर) च्या अनुसार, स्थापन झालेल्या सिक्युरिटी कौन्सिल कमिटीने मंजुर केलेली व्यक्ती व संस्था ह्यांची यादी भारत सरकारकडून मिळाल्यावर, रिझर्व बँक ती यादी सर्व बँका व वित्तसंस्थांना पाठविते. रिझर्व बँकेने पाठविलेली अशी यादी अद्यावत केली जाईल ह्याची बँकांनी खात्री करुन घ्यावी. ह्याशिवाय अशा व्यक्ती व संस्थांची यादी, युनायटेड नेशन्सच्या, http://www.un.org/sc/committees/1267/consolist.shtml ह्या वेबसाईटवर ही पाहता येईल. बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी नवीन खाते उघडण्यापूर्वी, भावी ग्राहकाचे नावे ह्या यादीत नाहीत ह्याची त्यांनी खात्री करुन घ्यावी. ह्याशिवाय, बँकांनी त्यांची सर्व विद्यमान खाती स्कॅन करुन खात्री करुन घ्यावी की, त्या यादीत असलेल्या कोणात्याही व्यक्ती किंवा संस्थेच्या नावे अथवा संबंधित असे कोणतेही खाते नाही. ह्या यादीत असलेल्या व्यक्ती किंवा संस्थांशी साम्य असलेल्या खात्यांची संपूर्ण माहिती, आरबीआय व एफआययु-आयएनडी ह्यांना ताबडतोब कळविली जावी.

क) येथे नोंद करण्यात यावी की, केवायसी मानके/एएमएल मानके/सीएफटी उपाय हे, गुन्हेगारांद्वारे बँकिंग वाहिन्यांचा गैरवापर होणार नाही ह्याची खात्री करण्यासाठीच विहित केले गेले आहेत. ह्यासाठी बँकांनी, त्यांच्या नोकरभरती/भाड्याने घेण्याच्या प्रक्रियेचा एम मुख्य भाग म्हणून, योग्य अशी छाननी करण्याची प्रक्रिया ठेवणे बँकांसाठी आवश्यक ठरते.

ड) ही मार्गदर्शक तत्वे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ (एएसीएस) च्या कलम ३५ अ खाली दिली असून त्यांचे उल्लंधन केले गेल्यास ह्या अधिनियमाच्या तरतुदीखाली त्यासाठी दंडात्मक कारवाई केली जाईल.

## संयुक्त खाती - “दोन्हीपैकी एक किंवा जीवित व्यक्ती” “दुसरी व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती” “आधीची/पहिली व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती” इत्यादि

एलएसी/१९-९६-२९/ २८ ऑगस्ट १९८०

सभासद बँकांचे मुख्य अधिकारी

महोदय,

**संयुक्त खाती - “दोन्हीपैकी एक किंवा जीवित व्यक्ती” “दुसरी व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती” “आधीची/पहिली व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती” इत्यादि**

अलिकडील भूतकाळात, बचत बँक किंवा मुदत ठेवी खात्यांच्या खातेदारांकडून, विशेषतः, मुदतपूर्व प्रदान किंवा एक खातेदार मृत झाल्यास करावयाची तडजोड ह्याबाबत येणाऱ्या अडचणंसंबंधाने वृत्तपत्रात अनेक पत्रे प्रसिध्द झाली आहेत. अशा खात्यांबाबत अनुसारावयाच्या कार्यरीतींसंबंधाने आणि “कोणीही एक किंवा जीवित व्यक्ती”, “दुसरी व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती”, “आधीची व्यक्ती किंवा जीवित व्यक्ती” इत्यादी संज्ञांच्या कायदेशीर गर्भितार्थाबाबत काही संभ्रम व गैरसमज असल्याचे दिसून येत आहे.

### २) संयुक्त खाती

दोन किंवा अधिक व्यक्तींच्या संयुक्त खात्यांबाबत (चालु, बचत किंवाठेवी खाते) व ज्यांच्या संबंधीच्या अटींनुसार, त्या खातेदारांपैकी एकाच्या मृत्युनंतर, त्या खात्यामधील रक्कम, जीवित व्यक्तींना देता येत नाही अशा वेळी, त्या रकमेचे प्रदान, संयुक्त खात्याच्या मृत खातेदाराच्या जीवित व्यक्तींना व कायदेशीर वारसांना संयुक्तपणे केले जावे. अशा बाबतीत, मृत व्यक्तीचे कायदेशीर वारस कोण आहेत त्याची खात्री करुन घेण्यासाठी, त्या दाव्याची तडजोड करण्यापूर्वी, (त्या मृत व्यक्तीच्या इस्टेटीबाबत) कायदेशीर प्रतिनिधित्व मिळविण्याबाबत आग्रह धरला जाणे ही बँकांची रीत आहे. असे कायदेशीर प्रतिनिधित्व मिळाविण्यासाठी विलंब व खर्च येत असल्याने, बँकांनी पुढील अटींवर संयुक्त खाते उघडण्यास प्रोत्साहन द्यावे–
(अ) दोन्हीपैकी एक किंवा जीवित (ब) आधीची/नंतरचा किंवा जीवित व्यक्ती, (क) कोणीही एक किंवा जीवित व्यक्ती इत्यादि. बँकांमधील ग्राहक सेवेवरील कार्यकारी गटाची शिफारस क्र. ६ मध्ये ह्यामुद्दयावर जोर देण्यात आला आहे.

### ३) जीवित व्यक्ती कलमाचे (सर्वायवरशिप) फायदे

जीवित व्यक्ती कलमाचा फायदा घेतला गेल्यास, नंतरच्या जीवित व्यक्तीबाबत बँक आपले कर्तव्य वैधपणे पूर्ण करु शकते. वास्तविक जीवित व्यक्तीला प्रदान केल्याने बँकेचे वैध कर्तव्य पूर्ण होत असले तरी, त्या खात्यामधील शिल्लकेची एकमेव लाभार्थी मालक किंवा मृत व्यक्तीचा कायदेशीर वारस नसेपर्यंत, ती जीवित व्यक्ती, ते पैसे स्वतःजवळ ठेवू शकते अशा रितीने, जीवित व्यक्तीचा हक्क, ती व्यक्ती वरीलप्रमाणे एकमेव लाभार्थी मालक किंवा मृत व्यक्तीचा कायदेशीर वारस नसल्यास, केवळ बँकेकडून पैसे गोळा करण्यापुरताच असतो. मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांनी बँकेतील पैशांवर हक्क सांगितल्यास, त्यांना सांगता येईल की, त्या खात्याला लागु असलेल्या कराराच्या अटींनुसार, त्या जीवित व्यक्तीलाच बँक प्रदान घेण्याचा हक्क असून, एखाद्या सक्षम कोर्टाकडून त्याबाबत बँकेवर मनाई हुकुम बजावला जाईपर्यंत, त्या खात्यामधील जीवित व्यक्तीला प्रदान करणे हे बँकेच्या हक्काबाहेर नाही. थोडक्यात, अशी परिस्थिती आहे की, सक्षम कोर्टाकडून बँकेवर मनाई हुकुम बजावला जाईपर्यंत, बँकेकडून जीवित व्यक्तीलाच प्रदान केले जाईल.

### ४) संयुक्त बचत खाते - दोन्हीपैकी एक किंवा जीवित व्यक्ती/कोणीही एक किंवा जीवित व्यक्ती

वरील परिच्छेद ३ मध्ये सांगितल्याप्रमाणे, जीवित व्यक्ती बँकेला वैध डिसचार्ज देऊ शकते. कायदेशीर वारसांनी त्या रकमेवर हक्क सांगितल्यास, बँक त्यांना कळवू शकते की, जीवित व्यक्तीला प्रदान करण्याबाबत, त्यांनी एखाद्या सक्षम कोर्टाचा मनाई हुकुम आणून तो बँकेवर बजावीपर्यंत, बँकेला तसे करण्यास हक्क आहे.

### ५) संयुक्त मुदत ठेव खाते - खातेदारांपैकी एकाचा मृत्यु झाल्यास मुदतपूर्व/ प्रदान किंवा कर्ज

### ५.१ “दोन्हीपैकी एक जीवित व्यक्ती” किंवा “कोणीही एक जीवित व्यक्ती” प्रकारचे खाते.

वरील प्रमाणे असलेल्या संयुक्त ठेव खात्याच्या बाबतीत, संयुक्त खातेदारांपैकी एकाचा मृत्यु झाल्यास, जीवित असलेल्या ठेवीदारांकडून, त्या ठेवीची मुदत पूर्व निकासी करण्यास परवानगी मागण्याची किंवा त्या ठेवपावती विरुध्द कर्ज देण्याची बँकेला अनेकदा विनंती केली जाते. अशा जीवित असलेल्या ठेवीदारांच्या ठेवपावती विरुध्द कर्ज मंजुर करण्यासाठी पुढील गोष्टी असल्यास ती विनंती मान्य करणे योग्य होईल- (१) त्या ठेवीबाबतच्या करारनाम्यात मुदत संपण्यापूर्वी प्रदान करण्याचे कलम असावे, आणि (२) मूळ ठेवीदारांकडून “दोन्हीपैकी एक जीवित व्यक्ती/कोणीही एक जीवित व्यक्ती” बाबतचे मँडेट मिळालेले असावे. जीवित असलेल्या ठेवीदारांकडून आलेल्या विनंतीचा विचार खास बाबतीत केला जावा. पण अशा कर्ज प्रकरणांच्या बाबतीत, ती ठेव मुसत संपल्यावर परत करण्यापूर्वी, मृत्यु ठेवीदारांच्या कायदेशीर वारसांनी त्या ठेवीबाबत सक्षम हक्क दाखल केल्यास बँकांना जोखमी येण्यास शक्यता आहे. अशा प्रसंगी, बँकांना त्या कर्जदारांकडे लक्ष द्यावे लागेल. मुदतपूर्व प्रदान किंवा कर्ज मंजुरीची अशी परिस्थिती सर्व खातेदार जिवंत असलेल्या संयुक्त खात्याच्या बाबतीतही (कोणीही एक जीवित/जीवित व्यक्तींपैकी एक/किंवा जीवित व्यक्ती कलम असलेले) लागु होते.
कार्यकारी समंजसपणाचा एक उपाय म्हणून, मुदत ठेवीच्या करारनाम्यात, म्हणजे खाते उघडण्याच्या फॉर्म मध्ये, असे एक कलम टाकण्यात यावे की, ठेवीच्या कालावधीमध्ये, प्रत्येक/

कोणत्याही ठेवीदाराला, कोणत्याही वेळी कर्ज/मुदतपूर्व प्रदान खाली दिलेल्या परिच्छेद ६ मध्ये दिल्यानुसार करता येईल.

**५.२ संयुक्त मुदतठेव - आधीची किंवा जीवित व्यक्ती/दुसरी किंवा जीवित व्यक्ती इत्यादि.**

ह्या मुदतठेवींच्या बाबतीत, मूळ मालक असलेल्या ठेवीदाराचा (आधीची/दुसरी व्यक्ती) उद्देश म्हणजे, त्याचा मृत्यु झाल्यासच त्या मुदतठेवीचे प्रदान जीवित व्यक्तीला मिळण्यास मदत व्हावी. तो (मूळ मालक ठेवीदार) त्याच्या मृत्युपर्यंत किंवा ती ठेव परिपक्व होईपर्यंत, ह्यापैकी जे प्रथम होईल तोपर्यंत, कोणत्याही वेळी त्या पैशांची वासलात लावण्याचा हक्क राखून असतो. ह्यासाठी, त्या मुदत ठेवीबाबतच्या अन्य पक्षांकडून संमतिपत्र घेण्याचा आग्रह धरता, बँकांना, अशा ठेवींबाबत, मुदतपूर्व प्रदान करण्यास किंवा त्या ठेवींविरुध्द अग्रिमराशी देण्यास हरकत नसावी. येथेही, मुदत ठेवीच्या खाते उघडण्याच्या करारनाम्यात किंवा अर्जाच्या फॉर्मवर सुयोग्य असे कलम घालून, संयुक्त ठेवीदारांना परिस्थितीची स्पष्ट जाणीव देणे हिताचे आहे.

**६) मुदत ठेव पावतीसाठी, अर्जामध्ये/खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये विशेष कलम घालणे.**

मुदत ठेवीच्या करारनाम्या संबंधाने खाते उघडण्याचा फॉर्म/अर्जाचा फॉर्म ह्यामध्ये पुढील प्रकारचे एक कलम घालण्याबाबत बँका विचार करु शकतातः- “श्री ----------------- आधीचा/नंतरचा, आमच्यापैकी **सर्वप्रथम नाव**, दुसरे नाव इत्यादि ह्यांना किंवा **दोन्हीपैकी एक किंवा जीवित व्यक्ती** ह्यांना, त्यांनी केलेल्या आमच्यापैकी कोणीहि जीवित व्यक्तींपैकी कोणालाही किंवा त्या जीवित व्यक्तींच्या जीवित व्यक्तीला, वरील व्यक्तीकडून (श्री...) लेखी पत्र मिळाल्यास, बँकेने ठरविलेल्या अटी व शर्तीवर - अ) आमच्या संयुक्त नावाने द्यावयाच्या मुदत ठेवीच्या पावतीच्या प्रतिभूतीवर, कर्ज/अग्रिम राशी बँक देऊ शक्ते. किंवा ब) ह्या ठेवीच्या रकमेबाबत, आधीचा, नंतरचा/**आमच्यापैकी सर्वप्रथम नाव घातलेला**/दुसरा किंवा आमच्या नंतरची जीवित व्यक्ती इत्यादिंना मुदतपूर्व प्रदान करु शकते.”

**महापरिपत्रक**
**ठेवी खाती चालविणे**

**फॉरिन कॉंट्रिब्युशन्स (रेग्युलेशन अधिनियम, १९७६**
**खाली असलेल्या संघांना मिळालेल्या विदेशी सहाय्याची सविस्तर माहिती**
**(संदर्भ, परिच्छेद ५.८.५)**

**एफसी (आर) अधिनियम, १९७६ खाली, भारतातील निरनिराळ्या संघ/संस्थांना मिळालेले विदेशी सहाय्य**

बॅंकेच्या शाखेचे नाव व पत्ता-

| अनुक्रमांक | संघाचे नाव, पत्ता आणि खाते क्रमांक | एफसी (आर) अधिनियम १९७६ खालील पंजीकरण क्र. | एफसी (आर) अधिनियम,१९७६ खाली दिलेल्या परवानगीबाबत एमएचए पत्रांची तारीख व क्रमांक, | खात्यात जमा झाल्याची तारीख | रक्कम (रु) | उपलब्ध असल्यास देणाराची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**महापरिपत्रक**

**ठेवी खाती चालविणे**

**अ) ह्या महापरिपत्रकात समाविष्ट केलेल्या परिपत्रकांची यादी**

| **क्रमांक** | **परिपत्रक क्र.** | **दिनांक** | **विषय** |
|---|---|---|---|
| १ | युबीडी.सीओ.बीपीडी.सीआयआर क्र. ५६ / ०९.३९.००० / २००८-०९ | १२.०३.०९ | नामनिर्देशनाची पोच आणि पासबुके/स्थिर ठेवी पावत्यांवर नामनिर्देशितांची नावे घालणे |
| २ | युबीडी.सीओ.बीपीडी.सीआयआर क्र. ९ / १३.०१.००० / २००८-०९ | ०१.०९.०८ | युसीबीमधील बिनहक्काच्या ठेवी व अकार्यकारी/ सुप्त खाती |
| ३ | डीपीएसएस क्र. २०९६/०४.०४.००७/०७-०८ | २०.०६.२००८ | मोठ्या रकमेच्या व्यवहारांसाठी प्रदानाच्या इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा वापर |
| ४ | ४५/१३.०१.०००/२००७-०८ | १२.०५.२००८ | हरविलेल्या व्यक्तींबाबतच्या दाव्यांची तडजोड |
| ५ | डीपीएसएस क्र. १४०७/०२.१०.०२/२००७-०८ | १०.०३.२००८ | मोठ्या रकमेच्या व्यवहारांसाठी प्रदानाच्या इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा वापर |
| ६ | ३२/०९.३९.०००/२००७-०८ | २५.०२.२००८ | तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) मानके/अँटी मनी लाँडरिंग (एएमएल) मानके/ वित्तिय दहशतवादाचा सामना |
| ७ | २७/१२.०५.००१/२००७-०८ | ४.१२. २००७ | जिल्हा न्यायालयांनी नेमेलेले पालक |
| ८ | २१/१३.०१.०००/२००७-०८ | १५.११.२००७ | लॉक-इन काल असलेल्या ठेवी |
| ९ | २/०९.१८.३००/२००७-०८ | ४.७.२००७ | आयटी - उपयोजित वित्तिय समावेश |
| १० | युबीडी.सीओ.बीपीडी.सीआयआर क्र. १३.०१.०००/२००६-०७ | १९.०४.२००७ | एकमेव ठेवी खात्यात नामनिर्देशन सुविधा-युसीबी |
| ११ | युबीडी.सीओ.बीपीडी.सीआयआर क्र. ४६/१६.१२.०००/२००६-०७ | १९.४.२००७ | एनआरई/एनआरो खाती ठेवण्यासाठी मानके-युसीबी |
| १२ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. १९/१३.०१.०००/२००५-०६ | २४.११.२००५ | वित्तीय समावेश-युसीबी |
| १३ | युबीडी.पीसीबी.सीआयआर | १४.०७.२००५ | मृत ठेवीदारांबाबतच्या दाव्यांची |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्र.४/१३.०१.०००/२००५-०६ | | तडजोड करणे-सुलभकृत कार्यरीत-युसीबी |
| १४ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र.१४/०९.११.०१/२००४-०५ | २९.०७.२००४ | बँकांद्वारे चालु खाती उघडली जाणे - शिस्तीची गरज |
| १५ | युबीडी.पीसीबी.सीआयआर क्र. १४/०९.११.०१/२००४-०५ | २४.०४.२००४ | बँकांद्वारे चालु खाती उघडली जाणे - शिस्तीची गरज |
| १६ | युबीडी.सीओ.बीआर.२९/१६.४८.००/२०००-०१ | २९.०१.२००१ | मृत ग्राहकांच्या खात्यांमधील शिल्लक त्यांच्या कायदेशीर जीवित व्यक्तींना/हक्कदारांना देणे |
| १७ | युबीडी.बीआर. १५/१६.४८.००/२०००-०१ | २१.११.२००० | मृत ग्राहकांच्या खात्यांमधील शिल्लक त्यांच्या जीवित व्यक्तींना/हक्कदारांना देणे |
| १८ | युबीडी.सीओ.बीएसडी.आय/११/१२.०५.००/२०००-०१ | १५.११.२००० | ठेवी खाती उघडणे-तांत्रिक बाजूंची पूर्ती |
| १९ | युबीडी.बीआर.सीआयआर.३/१६.४८.००/२०००-०१ | २५.०८.२००० | मृत ग्राहकांच्या खात्यांमधील शिल्लक त्यांच्या जीवित व्यक्तींना/हक्कदारांना देणे |
| २० | युबीडी.क्र.बीएसडी.आय/१२/१२.०५.००/९९-२००० | २८.१०.९९ | फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ खाली निरनिराळे भारतीय संघ/संस्थाद्वारे विदेशी सहाय्याचा स्वीकार |
| २१ | युबीडी.क्र.बीआर ३२/१६.०४.००/९८-९९ | २८.६.९९ | ठेवी खात्यातील नामनिर्देशन सुविधा |
| २२ | युबीडी.क्र.बीएसडी.आय/पीसीबीज्.१८/१२.०५.०१/९८-९९ | ३०.०१.९९ | फॉरिन कॉंट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ खाली निरनिराळे भारतीय संघ/संस्थाद्वारे विदेशी सहाय्याचा स्वीकार |
| २३ | युबीडी.क्र.डीएस.पीसीबी.सीआयआर. १२/१.३.०१/९८-९९ | २१.१२.१९९८ | वृध्द/आजारी/अपंग व्यक्तींद्वारे बँक-खाती चालविणे |
| २४ | युबीडी.क्र.प्लान.पीसीबी.सीआयआर.२३/०९.५०.००/९७-९८ | २८.११.१९९७ | चेकबुक्स देणे |
| २५ | युबीडी.क्र.बीएसडी.आय/पीसीबी/०९/१२.०५.००/९७-९८ | १८.०९.१९९७ | खोटी/बेनामी ठेवखाती उघडणे व चोरलेले/खोटे संलेखन इत्यादि जमा करणे |
| २६ | युबीडी.क्र.आय व एल.४९/१२.०५.००/९५-९६ | १४.०३.१९९६ | बँकांमधील फसवणुक-विस्तारित काउंटर्स |
| २७ | युबीडी.क्र.आय व एल ५१/१२.०५.००/९५-९६ | १४.०३.१९९६ | खोट्या खात्यांद्वारे बँकांमधील फसवणुकी |
| २८ | युबीडी.क्र.आय व एल.पीसीबी.४४/१२.०५.००/९५-९६ | २२.०२.१९९६ | ठेवीखात्यांवरील देखरेख |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | युबीडी.क्र.आय व एल.पीसीबी.३६/१२.०५.००/९५-९६ | ०५.०१.१९९६ | बँकांमधील फसवणुकी व गैरव्यवहार ह्यांच्या निरनिराळ्या पैलूंची चौकशी करण्यासाठी समिती |
| ३० | युबीडी.क्र.आय व एल.पीसीबी२८/१२.०५.००/९५-९६ | १०-११-१९९५ | ठेवीखात्यांवरील देखरेख |
| ३१ | युबीडी.क्र.आय व एल.पीसीबी/६५/१२.०५.००/९४-९५ | २८-०६-१९९५ | बँकांमधील फसवणुकी - ठेव खात्यांवर देखरेख |
| ३२ | युबीडी.क्र.आय व एल(पीसीबी) ३८/१२.१५.००/९४-९५ | १०-०१-१९९५ | वित्तमंत्रालयावरील (इकॉनॉमिक अफेअर्स विभाग) एस्टिमेट्स कमिटीचा ३४वा अहवाल - फसवणुकी टाळणे |
| ३३ | युबीडी.क्र.आय व एल.२७/१२.०५.००/९४-९५ | ३१-१०-१९९४ | बँकांमधील फसवणुकी व गैरव्यवहार ह्यांच्या निरनिराळ्या पैलूंची चौकशी करण्यासाठी समिती - ठेवीदारांचे फोटो मिळविणे |
| ३४ | युबीडी.क्र.आय व एल/पीसीबी २४/१२.०५.००/९४-९५ | १९-१०-१९९४ | प्रदान संलेखाचे लबाडीने रोखीकरण |
| ३५ | युबीडी.क्र.आय व एल. ७४/१२.०५.००/९३/९४ | २७-०५-१९९४ | बँकांमधील फसवणुकी व गैरव्यवहार ह्यांच्या निरनिराळ्या पैलूंची चौकशी करण्यासाठी समिती |
| ३६ | युबीडी.क्र.३६/१२.०५.००/९३-९४ | ०८-१२-१९९३ | बँकांमधील फसवणुकी व गैरव्यवहार ह्यांच्या निरनिराळ्या पैलूंची चौकशी करण्यासाठी समिती -प्राथमिक सहकारी बँका |
| ३७ | युबीडी.डीसी.१/व्ही.१-८९/९० | ०२-०१-१९९० | आई पालक असलेली अल्पवयीन व्यक्तींच्या नावे बँकखाती उघडणे |
| ३८ | युबीडी.क्र. बीआर.६९५/बी.१-८८/८९ | १९-१२-१९८८ | मृत ग्राहकांच्या खात्यांमधील शिल्लक त्यांच्या कायदेशीर जीवित व्यक्तींना/हक्कदारांना देणे - वारसा प्रमाणपत्राचा आग्रह न धरणे - इतर ॲसेट्सचा विस्तार |
| ३९ | संदर्भ. युबीडी.क्र.डीसी.१८/व्ही.१-८८/८९ | १०-०८-१९८८ | खाजगी संस्थांनी ठेवी गोळा करण्यासाठी काढलेल्या योजना - बँकांद्वारे लॉटरी तिकिटांची विक्री |
| ४० | युबीडी.क्र. बीआर.४८३/बी१- | २१-१०-१९८७ | बँकांमधील फसवणुकी व |

| | | | |
|---|---|---|---|
| | ८७/८८ | | गैरव्यवहार ह्यांच्या निरनिराळ्या पैलूंची चौकशी करण्यासाठी समिती |
| ४१ | युबीडी.क्र.आय व एल ८८/जे.१-८७/८८ | ०८-०६-१९८७ | बँकिंग प्रणाली व आयकर प्राधिकरणांच्या दरम्यान अधिकार समन्वय असण्यासंबंधीच्या बाबी |
| ४२ | युबीडी.डीसी.१९/व्ही.१.८६/८७ | ०३-०९-१९८६ | इनकॉर्मोरेट न झालेल्या/प्रा.लि. कंपन्यांद्वारे “बँक गॅरंटीसह” ठेवींचा स्वीकार |
| ४३ | युबीडी.बीआर.१३/ए-८६/८७ | ११-०८-१९८६ | बँकिंग लॉज (ॲमेंडमेंट) अधिनियम,१९८३ - कलम ४५ झेडए ते ४५ झेडएफ, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम,१९८५ च्या कलम ५६ सह वाचणे - सहकारी बँका नामनिर्देशन नियम,१९८५ - नामनिर्देशन सुविधा |
| ४४ | युबीडी.क्र.आय व एल ११०/जे.आय-८५/८६ | ०२-०६-१९८६ | ठेवी खाती उघडणे |
| ४५ | युबीडी.बीआर.७६४ए/ए-६-८४/८५ | २९-०३-१९८५ | बँकिंग नियम (सुधारणा) अधिनियम, १९८३-८४ - उर्वरीत तरतुदी अंमलात आणणे |
| ४६ | युबीडी.(डीसी)११४८/व्ही.१-८४/८५ | २२-०२-१९८५ | आइ पालक असलेले, अल्पवयीन व्यक्तीच्या नावे बँक खाते उघडणे |
| ४७ | युबीडी.बीआर.१६/ए.६-८४/८५ | ०९-०७-१९८४ | बँकिंग नियम (सुधारणा) अधिनियम,१९८३ |
| ४८ | डीबीओडी.युबीडी.(एल व आय).क्र..२५८४/जे१-८२/८३ | २२-०३-१९८३ | प्राथमिक सहकारी बँकांमध्ये निरनिराळी ठेवी खाती उघडणे - प्रस्तावना |
| ४९ | एसीडी.आयडी(पी)६४२८/जे.१/८० -८१ | १७-०२-१९८१ | संयुक्त खाती - “कोणीही एक किंवा जीवित व्यक्ती”, “दुसरा किंवा जीवित व्यक्ती”, “आधीचा किंवा जीवित व्यक्ती” इत्यादि |
| ५० | एसीडी.आयडी ४९९८-जेः १७-७६-७ | ०९-१२-१९७६ | ठेवी खाती प्रस्तावना |
| ५१ | एसीडी.आयएनएसपी. | १७-०६-१९७१ | बिनहक्काच्या ठेवींसाठी रजिस्टर |

| | | | |
|---|---|---|---|
| | ५१७३/एफ:१५/७०-७१ | | |
| ५२ | एसीडी.बीआर.१४५४/ए.१/६७-८ | ०८-०४-१९६८ | प्राथमिक कर्ज सोसायटी किंवा सहकारी बँक सोडून, एखाद्या सहकारी सोसायटीद्वारा बँकिंग नियम (सहकारी सोसायट्यांना लागु होणारे) अधिनियम, १९६५ ची अंमलबजावणी होण्यापूर्वी स्वीकारलेल्या ठेवींची स्थिती |